www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार






संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले   उपसंपादक - श्री विलास गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश पाटील   सह संपादक - श्री मुकुंद कांबळे   महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3   अंक : ७६   सोमवार, २४ नोव्हेंबर २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : ८   RNI MAHMAR/2023/89514

## नाशिक परिक्रमा मार्ग अखेर एमएसआयडीसीकडे
# ६६.१५ किमीच्या मार्गाच्या आखणीस मान्यता

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** नाशिक शहरातील अंतर्गत वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी आणि सिंहस्थ कुंभमेळ्यात वाहतुकीचे व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) नाशिक परिक्रमा मार्ग (नाशिक रिंग रोड) प्रस्तावित केला होता. मात्र आता हा प्रकल्प एमएसआरडीसीऐवजी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसी) मार्गी लावणार आहे. हा प्रकल्प एमएसआयडीसीकडे देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. त्यानुसार आता एमएसआयडीसीच्या माध्यमातून राबविण्यास मान्यता देणारा शासन निर्णय शुक्रवारी सार्वजनिक बांधकाम



विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आला आहे. तसेच ६६.१५ किमीच्या नाशिक परिक्रमा मार्गाच्या आखणीसही मान्यता देण्यात आली आहे.

नाशिक परिक्रमा मार्गाचे काम एमएसआरडीसीने वेगाने सुरू केले होते. मात्र प्रकल्पासाठीच्या ७५०० कोटी रुपयांच्या निधीचे आव्हान एमएसआरडीसीसमोर होते. अशात हा प्रकल्प राबविण्यासाठी एमएसआयडीसी उत्सुक होते. त्यानुसार या प्रकल्पाच्या बांधकामासाठी (स्थापत्य) एमएसआयडीसीला निधी देण्यास केंद्र सरकारच्या रस्ते परिवहन व राज्यमार्ग मंत्रालयाने होकार दिली. त्यामुळे अखेर राज्य सरकारने हा प्रकल्प एमएसआयडीसीला देण्याचा निर्णय घेतला आणि आता अखेर हा प्रकल्प एमएसआरडीसीकडून एमएसआयडीसीकडे गेला आहे. यासंबंधीचा शासन निर्णय शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आला आहे. या शासन निर्णयानुसार डीआरडीओ जंक्शन आडगाव-दिंडोरी रोड, कांबळे शिवार-राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८८४-पेठ गवळवाडी-गंगापूर रोड-गोवर्धन-त्रंबक महामार्ग-बेलगाव ढगा-नाशिक मुंबई महामार्ग-विल्होली रा.म.क्र.६० सिन्नर फाटा-आडगाव अशा एकूण ६६.१५ किमी लांबीच्या नाशिक परिक्रमा मार्गास मान्यता देण्यात आली आहे. हा प्रकल्प एमएसआयडीसीच्या माध्यमातून हाती घेण्यासही मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे ८ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

प्रकल्पाच्या खर्चानुसार भूसंपादनासाठीचा ३६५९.४७ कोटीच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. हा निधी नाशिक-त्र्यंबेकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाद्वारे उपलब्ध करुन देण्यात येणार असून त्यासही मान्यता देण्यात आली आहे.

## शाळा गाठणाऱ्या विद्यार्थ्यांना एसटी दिलासा देणार; शालेय विद्यार्थ्यांसाठी हेल्पलाइन

### एसटी बस रद्द झाल्यास मिळणार तत्काळ मदत

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** एसटी बसमधून शाळा-महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना लवकरच दिलासा मिळणार आहे. एसटी प्रवासात काही अडचण आल्यास, एसटी बसेस वेळेवर न आल्यास अथवा अचानक रद्द झाल्यास त्यांना योग्य ती मदत मिळावी, यासाठी लवकरच एसटी महामंडळ हेल्पलाइन सुरू करणार आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शालेय नुकसानीला आगार व्यवस्थापक जबाबदार असणार आहेत.

राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागाकडून मानव विकास निधी अंतर्गत राजाच्या दुर्गम व आदिवासीबहुल भागामध्ये शालेय विद्यार्थिनींना प्रवासी सेवा देण्यासाठी मानव विकास बस उपलब्ध करून दिलेल्या आहेत. बस शालेय विद्यार्थिनींची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात याव्यात, अशा सूचना असतात. परंतु अनेक आगारात या नियमाची पायमल्ली होते. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप



सरनाईक यांनी धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकाला भेट दिली. यावेळी उपस्थित शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींनी याबाबत अनेक समस्या व तक्रारी मंत्र्यांकडे मांडल्या. अनेक शालेय बस वेळेवर न सुटणे, गर्दी असल्यामुळे थांब्यावर न थांबणे, बस उशिरा येणे अथवा अचानक रद्द होणे यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार काही विद्यार्थ्यांनी केली. संध्याकाळी शाळा-महाविद्यालय सुटल्यानंतर किमान एक तासात मुले घरी जाणे अपेक्षित असते. मात्र बस वेळेवर न आल्याने अथवा अचानक रद्द झाल्याने मुलांना घरी पोहोचण्यास उशीर होतो.

## थोडक्यात

### सिंहगड किल्ल्यावर वाहतूक बंद; पर्यायी मार्ग जाहीर

**वेल्हे :** पुणे ग्रँड चॅलेंज टूर सायकल स्पर्धा २०२६ च्या पार्श्वभूमीवर आणि रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामामुळे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी सिंहगड घाटमार्गावरील वाहतुकीत बदल करण्याचे आणि किल्ल्यावरील वाहतूक बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.२४ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून डोणजे गोळेवाडी टोलनाका ते सिंहगड घाटातील कोंढणपूर टोलनाका ते अवसरेवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर डांबरीकरणाचे काम केले जाणार आहे. या कालावधीत या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात आली आहे. पर्यायी मार्गावरून वाहतूक करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये सिंहगड किल्ल्यावर पर्यटनासाठी येणारी वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत.

## पुणे पोलिसांची मध्य प्रदेशात धडक कारवाई; शस्त्रास्त्र रॅकेटचा पर्दाफाश



**३६ जण ताब्यात**

**दैनिक युवक आधार**

**पुणे प्रतिनिधी :** मध्य प्रदेशातील बडवानी जिल्ह्यातील एका दुर्गम गावातून चालवल्या जाणाऱ्या मोठ्या आंतरराज्यीय बेकायदेशीर शस्त्रनिर्मिती आणि तस्करी रॅकेटचा पुणे पोलिसांनी धडक कारवाई करून पर्दाफाश केला आहे. या सापळ्यात तब्बल ३६ जणांना ताब्यात घेण्यात आले असून मोठ्या प्रमाणात पिस्तूल, दारूगोळा आणि शस्त्रनिर्मितीचे साहित्य जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

**उमर्ती गावातील भट्ट्यांवर संयुक्त धडक**

गेल्या तीन आठवड्यांत पुण्यात संशयास्पद हालचालीदरम्यान अनेक पिस्तुलांची जप्ती झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची मोहीम राबवली. त्यातून बडवानी जिल्ह्यातील उमर्ती गावात गुप्तपणे शस्त्रे तयार केली जात असल्याचा धागा मिळाला. त्यानंतर पुणे पोलिसांनी मध्य प्रदेश पोलिसांशी संपर्क साधून संयुक्त छापेमारी मोहीम आखली.

या कारवाईत बेकायदेशीर शस्त्रे तयार करणाऱ्या तब्बल ५० भट्ट्या उद्ध्वस्त करण्यात आल्या. या भट्ट्यांमधून आधुनिक पद्धतीने देशी पिस्तुले तयार करून ती विविध राज्यांत, विशेषतः महाराष्ट्रातील गुन्हेगारी गटांना पुरवली जात असल्याचा संशय आहे.

**'पुरवठा साखळी'चा मोठा धागा**

पुण्यात जप्त झालेल्या २१ पिस्तुलांच्या पुरवठ्याचा शोध घेत असताना सर्व धागे मध्य प्रदेशातील शस्त्रनिर्मिती केंद्रांकडे पोहोचत होते. पुण्यात अटक करण्यात आलेल्या काही गुन्हेगारांच्या चौकशीतून ही माहिती स्पष्ट झाली.

"ही एक मोठी पुरवठा साखळी आहे. या शस्त्रांचा प्रवास मध्य प्रदेशातून सुरू होऊन महाराष्ट्रातील विविध ठिकाणांपर्यंत पोहोचत होता. आणखी किती लोक या रॅकेटमध्ये सामील आहेत याचा शोध घेणे सुरू आहे,"

## जळगावमध्ये तीन लाख ग्राहकांकडे ५३७ कोटींची थकबाकी; वीजपुरवठा होणार खंडित!


**दैनिक युवक आधार**

**जळगाव प्रतिनिधी :** वीजबिलांच्या वसुलीसाठी थकबाकीदारांचा पुरवठा खंडित करण्याची धडक मोहीम महावितरणने सुरू केली आहे. जिल्ह्यात तीन लाखांहून अधिक ग्राहकांकडे ५३७ कोटी रुपयांचे वीजबिल थकित आहे.

ग्राहकांनी चालू बिलासह थकबाकी भरून सहकार्य करावे आणि वीजपुरवठा खंडित होण्याची कारवाई टाळावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

जिल्ह्यात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक, पथदिवे, सार्वजनिक पाणीपुरवठा, सार्वजनिक सेवा व इतर वर्गवारीतील एकूण ३ लाख १६ हजार ६८१ ग्राहकांकडे ५३७कोटी ४१ लाख रुपयांची थकबाकी आहे.

यात घरगुती वर्गवारीतील २ लाख ८५ हजार ६०७ ग्राहकांकडे ६९ कोटी ५५ लाख, व्यावसायिक वर्गवारीतील १९ हजार ३२४ ग्राहकांकडे ११ कोटी ४१ लाख, औद्योगिक वर्गवारीतील २ हजार ८४२ ग्राहकांकडे ७ कोटी ४० लाख, पथदिवे



वर्गवारीतील २८२३ ग्राहकांकडे १७४ कोटी ८३ लाख, सार्वजनिक पाणीपुरवठा वर्गवारीतील २३७९ ग्राहकांकडे २६८ कोटी ८४ लाख, सार्वजनिक सेवा व इतर वर्गवारीतील ३७०६ ग्राहकांकडे ५ कोटी ३९ लाख रुपयांची थकबाकी आहे.

विभागनिहाय विचार करता भुसावळ विभागात ७१ कोटी ३७ लाख, चाळीसगाव विभागात ३८ कोटी ४८ लाख, धरणगाव विभागात १२३ कोटी ६८ लाख, जळगाव विभागात ४७ कोटी १० लाख, मुक्ताईनगर विभागात ४२ कोटी ३७ लाख, पाचोरा विभागात ५८ कोटी ६२ लाख व सावदा विभागात १५५ कोटी ७८ लाख रुपयांची थकबाकी आहे.

**महावितरणकडून वीजबिल वसुली मोहीम सुरु**

**१ पपिलाए सून आजपर्यंत २६१६, चाळीसगाव विभागातील ११०७, धरणगाव विभागातील २६०१, जळगाव विभागातील १३२३, मुक्ताईनगर विभागातील ९२४, पाचोरा विभागातील २४०५ व सावदा विभागातील ९५५ अशा जळगाव जिल्ह्यातील एकूण ११ हजार ९३१ ग्राहकांचा वीजपुरवठा थकबाकीपोटी तात्पुरता खंडित करण्यात आला आहे. तरी जिल्ह्यातील सर्व ग्राहकांनी थकबाकी व चालू वीजबिले भरून सहकार्य करावे व संभाव्य गैरसोय टाळावी.**

**आय. ए. मुलाणी, मुख्य अभियंता, जळगाव परिमंडळ महावितरण**

त्यामुळे जिल्ह्यात सर्वत्र महावितरणतर्फे धडक वीजबिल वसुली मोहीम सुरू करण्यात आलेली आहे.

## ग्लोबल साहित्य सफर भाग १ पुस्तकाचे प्रकाशन




**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** ज्यांच्या घरात ९००० पेक्षा देश विदेशातील पुस्तकांचा भंडार असलेले व सतत वाचनात रमलेले लेखक राजीव निळकंठ श्रीखंडे यांच्या ग्लोबल साहित्य सफर या पुस्तकाचा पहिला भाग शासनाने अनुदान दिलेल्या ग्रंथाली आयोजित कार्यक्रम दिनांक २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी साडेसहा ते साडेआठ या वेळात स्थळ दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र मुंबई येथे सांस्कृतिक कार्यमंत्री एडवोकेट आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

ग्रंथाचे प्रकाशन रामदास भटकळ यांनी केले. भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, ज्येष्ठ नाटककार अभ्यासक अभिराम भडकमकर या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आणि सभागृहातील वाचक प्रेक्षक साहित्यिक यांच्या उपस्थितीत या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

लेखक राजीव निळकंठ श्रीखंडे यांनी आपल्या पुस्तकामध्ये काय कसे वाचायचे हे माझी आई नलिनी हिचे अनमोल सहाय्य, साहित्य सफर घडण्याकरता माझे बाबा निळकंठ यांनी तसेच पत्नी रेणुका (अदिती), मुलगी अरुंधती या सर्वांनी माझ्या प्रत्येक कामात साथ देऊन प्रोत्साहित केले.

त्यामुळेच हे शक्य झाले असे मनोगत कृतज्ञतापूर्वक व्यक्त केले. या कामात ग्रंथालीचे सचिव सुरेश हिंगलासपूरकर यांचे सहकार्य लाभले आहे.

मुखपृष्ठकार हेमंत जोशी यांचे असून प्रस्तावना लेखक नंदन जोशी यांची आहे. कार्यक्रमांतर पुस्तक विक्री खरेदी करिता जे बाहेर पडले त्यापैकी धारावीतील जयराम सोनवणे लेखक कवी ,व श्री दिलीप गाडेकर वृत्तपत्र लेखक त्यांनी प्रथम राजीव श्रीखंडे यांचे पुस्तक खरेदी करून प्रत्यक्ष भेट घेऊन सदिच्छा दिल्या आणि आठवण म्हणून त्या पुस्तकावर त्यांची स्वाक्षरी घेऊन आपली उपस्थिती सोबतच छायाचित्र घेण्याचा लोभ आवरता आला नाही हे विशेष.

## नागरिकांनी सजग आणि सतर्क राहून देश सुरक्षेचे कान आणि डोळे व्हावे – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### शौर्य, शांतता आणि जागरूकतेचा संदेश देत 'ग्लोबल पीस ऑनर' कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :**

दहशतवादाविरुद्धचे युद्ध संपलेले नाही. या दहशतवादाच्या विरोधात लढण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सजग आणि सतर्क असले पाहिजे. कान आणि डोळे बनून सुरक्षेचे काम केले पाहिजे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. दिवीजा फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ग्लोबल पीस ऑनर कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राष्ट्रीय तपास यंत्रणेचे प्रमुख डॉ. सदानंद दाते, एनएसजी कमांडो सुनिल जोधा, रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्ष नीता अंबानी यांना ग्लोबल पीस ऑनर सन्मानाने गौरवण्यात आले.



२६/११ या काळजाला भिडणाऱ्या घटनेला १७ वर्षे झाली असली तरी त्या दिवसाची वेदना आजही आपणा सर्वांच्या मनात कायम असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईसह देशभरात भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या या हल्ल्यातील शहीदांना आदरांजली देण्यासाठी आणि हुतात्म्यांच्या स्मृती ताज्या ठेवण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे. पहलगाम येथे निष्पाप नागरिकांची हत्या करून दहशतवादी संघटना देशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा घटनांवरून आजही दहशतवादाचा धोका कायम असल्याचे स्पष्ट होत असून, प्रत्येक नागरिकाने सतर्क राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २६/११ चा हल्ला हा ताज किंवा मुंबईपुरता मर्यादित नव्हता. जसा अमेरिका 'ट्विन टॉवर' हल्ला म्हणजे अमेरिकेच्या सार्वभौमत्वावरील हल्ला होता, तसाच २६/११ चा हल्ला हा संपूर्ण भारताच्या सार्वभौमत्वाला दिलेला मोठा धक्का होता. त्या काळात ठोस प्रतिउत्तर दिले असते तर कदाचित पुन्हा असा हल्ला झाला नसता. परंतु आता परिस्थिती बदलली असून भारत मजबूत, सक्षम आणि निर्णायक देश म्हणून जगासमोर उभा आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर कारवाई करत जगाला आपली क्षमता दाखवून दिली. भारत निर्णायक कारवाई करणारा देश आहे. आज देशाची सुरक्षा यंत्रणा अत्यंत मजबूत झाली आहे. दिल्ली बॉम्बस्फोटापूर्वी सुरक्षा यंत्रणांनी मोठ्या प्रमाणात स्फोटक पदार्थ आणि शस्त्रे जप्त करून मोठा कट उधळून लावला आहे.दहशतवादी सरळ युद्ध करू शकत नाहीत म्हणून छुपे युद्ध सुरू आहे. अशा परिस्थितीत देशातील प्रत्येक नागरिकाने सतत जागरूक राहणे गरजेचे आहे. आजच्या दिवशी शहीद हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर, तुकाराम ओंबाळे, मेजर उन्नीकृष्णन आणि प्रकाश मोरे यांसह सर्व शूरवीरांना विनम्र अभिवादन करतो.

# आदिवासी समाजाचा पुढाकार: घरकुल लाभासाठी मार्ग मोकळा

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी महेश पेन्दोर** : घाटंजी मौजा चिखलवर्धा (पेसा ग्रामपंचायत)– गावातील अनेक घरकुल लाभार्थींचे प्रस्ताव गेल्या अनेक महिन्यांपासून कागदोपत्रातील त्रुटींमुळे प्रलंबित होते. लाभार्थ्यांनी ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रारी करूनही त्याकडे वेळोवेळी दुर्लक्षच झाले, ज्यामुळे अनेक कुटुंबे घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित राहिली होती.

आज या प्रलंबित प्रकरणांचा निकाल लावण्यासाठी विशेष कागदपत्र दुरुस्ती कॅम्प आयोजित करण्यात आला. हा उपक्रम श्री. रमेशभाऊ धुर्वे (माजी सभापती, घाटंजी) व विजय कनाके यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आला. तसेच गावचे महाजन सखाराम कुळसंगे, किशोर कोवे, हरिदास



घोडाम, शंकर धुर्वे, संभू पेंदोर, माणिक जुमनाके, दत्ता कुमरे, अविनाश कनाके यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

कॅम्पमध्ये विशाल मडगुळवार व मोरे (कर्मचारी) यांनी उपस्थित राहून लाभार्थ्यांची सर्व आवश्यक कागदपत्रे तपासून त्रुटी दुरुस्त करण्याची प्रक्रिया पूर्ण केली.या उपक्रमामुळे अनेक घरकुल लाभार्थ्यांना दिलासा मिळाला असून, लवकरच त्यांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

# 4 Mah Bn येथे एनसीसी दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सतीश कडू** : महाराज बाग, सिताबर्डी नागपूरच्या विरुद्ध दिशेला स्थित असलेल्या 4 महाराष्ट्र बटालियन, एनसीसी युनिटने आपला 78 वा स्थापना दिवस कार्यालयाच्या प्रांगणात संपन्न केला. यावेळी एनसीसी कॅडेट द्वारे काढण्यात आलेल्या रॅलीला कर्नल, गौतम कपूर, कमांडिंग ऑफिसर तसेच लेफ्टनंट कर्नल, अजय कुमार, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीला रवाना केले. ही रॅली लॉ स्क्वेअर पर्यंत मार्च करत युनिटला परत आली दरम्यान युनिटमध्ये AIIMS नागपूर द्वारा रक्तदान शिबिर आयोजित केले होते ज्यामध्ये एनसीसी कॅडेट




ने उत्साह पूर्वक सहभाग घेतला. एनसीसी गोल्डन ग्रुप मधील सुधीर देवगिरीकर यांच्या विशेष प्रयत्नांनी कॅडेट करिता प्रेरणादायी भाषणे आयोजित केल्या गेली होती ज्यामध्ये विना मोहोडीकर, अजय कांबळे आणि सुरेश शास्त्रकार यांनी आपले अनमोल विचार मांडलेत. तदनंतर युनिट प्रांगणात ध्वजारोहण, एनसीसी प्रतिज्ञा, एनसीसी गीत, केक कापणे असे कार्यक्रम संपन्न झालेत. या कार्यक्रमाला येथील एनसीसी छात्र, सुभेदार, अमरजीत सिंग यांच्यासह ऑफिस मधील संपूर्ण स्टाफ, एनसीसी गोल्डन ग्रुपचे सदस्य चंद्रशेखर पाठराबे, विना मोहाडीकर, गिरीश रोडे, अजय कांबळे, सुरेश शस्त्राकर, उषा कुरेकर, रत्ना गणोरकर आणि अनिल बालपांडे उपस्थित होते. अल्पलोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

# झिरो माईल लिटरेचर फेस्टिव्हल'च्या माध्यमातून वैचारिक कक्षा रुंदावतील - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ▶▶ ▶▶ चार दिवसीय 'फेस्टिव्हल' चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर**

**नागपूर** : मनुष्याला मानवी संवेदना आहेत. ही संवेदना अभिव्यक्त करण्याचे वरदान त्याला लाभले आहे. ही अभिव्यक्ती करण्यासाठी त्याच्याकडे भाषा, साहित्य, पुस्तके ही माध्यमे आहेत. अभिव्यक्ती संपते तिथे संस्कृती संपते. त्यामुळे ही प्रगल्भ संस्कृती जपण्याची गरज असून हा सांस्कृतिक ठेवा जपण्याचे काम पुस्तकांच्या माध्यमातून होत असते. नागपूर पुस्तक महोत्सवांतर्गत होत असलेल्या झिरो माईल लिटरेचर फेस्टिव्हलच्या माध्यमातून प्रगल्भता येऊन जाणिवा विस्तारित होतील. विविधांगी विषय या फेस्टिव्हलमध्ये मांडण्यात येतील. त्यातून वैचारिक कक्षा रुंदावून प्रगल्भ व्यक्तिमत्व तयार होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

नॅशनल बुक ट्रस्ट (एनबीटी) इंडियाच्या वतीने व महाराष्ट्र शासन आणि झिरो माईल यूथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नागपूर बुक फेस्टिव्हल 2025 अंतर्गत चार दिवसीय 'झिरो माईल लिटरेचर फेस्टिव्हल'चे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. 23 आणि 24 तसेच 29 आणि 30 नोव्हेंबरदरम्यान हा साहित्य महोत्सव रेशीमबाग मैदानावर होत आहे. या उद्घाटन कार्यक्रमाला शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ वर्ध्याच्या कुलगुरू व साहित्य



अकादमीच्या उपाध्यक्षा डॉ. कुमुद शर्मा, लेखक व शिवकथाकार विजयराव देशमुख, एनबीटीचे अध्यक्ष प्रा. मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, झिरो माईल यूथ फाऊंडेशनचे मार्गदर्शक सत्यनारायण नुवाल, अध्यक्ष अजय संचेती, संचालक समय बनसोड आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री पुढे बोलताना म्हणाले की, नागपूर हे समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेले शहर म्हणून ओळखले जाते. देशाला दिशा देणारे आणि देशाला दिशा देणाऱ्या अनेक घटनांचे साक्षीदार असलेले हे सांस्कृतिक शहर आहे. गोंड राजांनी सार्वजनिक ग्रंथालयाची परंपरा सुरू करून ज्ञानसंस्कृती रुजवली. भोसले काळात हिंदवी स्वराज्याच्या विस्तारात नागपूरने मोलाची भूमिका बजावली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे साहित्य हे अभिजात आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राजा बढे, राम शेवाळकर, महेश एलकुंचवार, सुरेश भट, ग्रेस, वि.भि. कोलते, ग.त्र्यं. माडखोलकर, मारुती चितमपल्ली, परशुराम खुणे यांच्यासारख्या अनेक साहित्यिकांनी या संस्कृतीला समृद्ध करण्याचे काम केले आहे. विदर्भाची भूमी ही भाषेच्या संगमाची भूमी आहे. मराठी आणि हिंदी साहित्य निर्मितीची समांतर समृद्ध परंपरा येथे पहायला मिळते. लिटरेचर फेस्टिव्हलच्या माध्यमातून नागपूरच्या सांस्कृतिक जडणघडणीत अत्यंत मोठा असा बदल होणार असल्याचे ते म्हणाले.

माहिती ही ज्ञानामध्ये परिवर्तित होत नाही तोवर ती केवळ माहिती असते. त्यामुळे माहितीकडून ज्ञानाकडे जायचे असेल तसेच ज्ञानी म्हणून नावलौकीक मिळवायचा असेल तर पुस्तकांशिवाय पर्याय नाही. तरुण पिढीपर्यंत पुस्तके पोहोचविण्याची गरज असल्याचेही ते पुढे म्हणाले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नागपूर बुक फेस्टिव्हलच्या यशस्वी आयोजनाबद्दल कौतुक केले. एनबीटी देशभरात वाचनसंस्कृती पुनर्स्थापित करण्याचे उत्कृष्ट कार्य करीत आहे. या उपक्रमाचा एक भाग असलेले नागपूर पुस्तक महोत्सव नवी उंची गाठेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

तत्पूर्वी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध पुस्तक प्रकाशनांच्या स्टॉल्सला

भेट दिली. मुख्यमंत्र्यांनी बालमंडपला भेट देऊन विद्यार्थ्यांशीही संवाद साधला.

वाचन संस्कृती जोपासण्याची गरज — राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले की, आजच्या काळात वाचनाची गरज सर्वाधिक आहे आणि त्या जाणिवेतून हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. डिजिटल माध्यमामुळे वाचनाला धोका निर्माण होत असल्याची चिंता व्यक्त होत असल्याच्या पार्श्वभूमीवर या पुस्तक महोत्सवाचे महत्त्व अधिक आहे. वाचन संस्कृती जोपासण्याची गरज आहे. या महोत्सवात 300 हून अधिक प्रकाशक आणि 15 लाखांहून अधिक पुस्तके उपलब्ध आहेत. परिसरातील विद्यार्थी आणि नागरिकांना याचा मोठा फायदा होईल. नागरिकांनी या महोत्सवाला भेट देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. शिवकथाकार विजयराव देशमुख यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनबीटीचे अध्यक्ष प्रा. मिलिंद सुधाकर मराठे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वेदिका मिश्रा यांनी केले तर आभार प्रदर्शन युवराज मलिक यांनी केले.

# सेंचुरी रेयॉन हायस्कूल येथे "राज्यस्तरीय शालेय रग्बी क्रीडा" स्पर्धेचे उद्धाटन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार,**

**रमेश राऊत कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे द्वारा आयोजित राज्यस्तरीय शालेय रग्बी क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन दि.२१ ते २३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत सेंचुरी रेयॉन हायस्कूल येथे करण्यात आले होते.

या स्पर्धेचे उद्धाटन दि.२२ नोव्हेंबर २०२५ रोजी उपायुक्त, क्रीडा उल्हासनगर महानगरपालिका श्रीमती स्नेहा कर्पे , वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संतोष आव्हाड , आंतरराष्ट्रीय रग्बी खेळाडू श्री.सचिन म्हसकर यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी सेंचुरी रेयॉन हायस्कूलचे कार्यकारी प्रमुख श्रीकांत गोरे, सेंच्युरी रेयॉन चे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री.मिलिंद भांडारकर, बी.के.बिर्ला महाविद्यालय तसेच शाळा व्यवस्थापनाचे मुख्याध्यापक तसेच संचालक कुलगुरू डॉ.नरेशचंद्र, सेंचुरी रेऑन शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना बदाने, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के,पर्यवेक्षक आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत




महाराष्ट्रातील आठ विभागांमधून मुलामुलींचे एकूण सोळा संघ सहभागी झाले होते. या संघांमधून मुलींच्या गटात लातूर विभागाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला असून नागपूर तसेच छत्रपती संभाजी नगर यांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त झाले. तर१४ वर्षाखालील मुले या गटात प्रथम क्रमांक कोल्हापूर या विभागास प्राप्त झाला असून लातूर व मुंबई या विभागांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त झाले.

ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेमधून स्पर्धेत सहभागी सर्वच आठही विभागातील खेळाडूंना उत्तम प्रतीचे ट्रॅक सूट देण्यात आले. तसेच स्पर्धेतील प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या खेळाडूंना सन्मानचिन्ह, मेडल आणि प्रत्येक विजयी खेळाडूला "स्मार्ट वॉच" देण्यात आले. ही स्पर्धा अत्यंत उत्साहाने खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.या स्पर्धेकरिता जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ तसेच सेंचुरी रेयॉन हायस्कूलचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

# प्रभाग क्र २ व ३ च्या उमेदवारासह काँग्रेस नगराध्यक्ष उमेदवार डॉ.सौ.दिपाली रपणवाड यांना मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर** : मुखेड नगर परिषद निवडणुक २०२५ मुखेड - प्रभाग क्र ३ चे उमेदवार सौ. नारनाळीकर लक्ष्मिबाई राजाराम,साबणे बालाजी माणिकराव प्रभाग क्र २ सौ.शालीनीताई संतोष बनसोडे,सुभाष श्रीमंगले सह नगराध्यक्ष पदाचे काँग्रेस उमेदवार सौ.डॉ.दिपाली श्रावण रॅपणवाड यांच्या प्रचारार्थ जि.प.चे माजी अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर यांच्या नेतृत्वाखाली मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या यावेळी महाराष्ट्र प्रदेश



काँग्रेसचे महासचिव डॉ.श्रावण रॅपणवाड,काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर,दिगांबरराव सोमवारे,अन्वर पठाण,बालाजी वाडेकर,प्रकाश निमलवाड,राजु बनसोडे, शिवाजी गायकवाड,गायकवाड वाय. पी.सर,हणमंतराव श्रीमंगले,संतोष बनसोडे,शिवाजी चैनपुरे, सुनिल पाटील आरगीळे,असदभाई बल्की,नरेश शिंदे,मोहसीन बल्की,सुनिल कांबळे,ईरफान मोमीन,संजय कामजे,शेख मकसुद,शेख रौफ,यांच्यासह पक्षपदाधिकारी प्रभागातील तरुण युवा वर्ग महिला भगीनी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.




# महाविद्यालयाच्या विकासात आबेद चाऊस यांचे योगदान महत्त्वपूर्ण : प्रा.मोहन परजने

## जय भवानी महाविद्यालयात आबेद चाऊस यांचा सेवानिवृत्ती निमित्त गौरव

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : जय भवानी महाविद्यालयाच्या प्रशासकीय विकासात कार्यालयीन अधिक्षक श्री.आबेद चाऊस यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. असे प्रतिपादन पर्यावारणवादी विचारवंत प्रा.मोहन परजने यांनी केले. ते पाटोदा येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान महाविद्यालयात कार्यालयीन अधिक्षक श्री.आबेद चाऊस यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित सेवा गौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते. या वेळी पुढे बोलताना ते म्हणाले की पाटोदा सारख्या दुर्गम भागात श्री. चाऊस यांनी प्रमाणिक कामातुन आपली ओळख निर्माण केली. एक उपक्रमशील प्रशासक म्हणुन काम केले. आदरणीय शिवाजीराव दादा व श्री.अमरसिंह पंडित यांनी टाकलेला विश्वास त्यांनी आपल्या कामातून सार्थ करून दाखवला. या वेळी त्यांनी त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. या प्रसंगी व्यासपीठावर विकास समितीचे सदस्य श्री. दिलीपराव जाधव, मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर, संस्थेचे मुख्यलेखापाल श्री.प्रताप हातोटे, सहलेखापाल प्रा.काशीनाथ गोगुले हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे होते. सत्कार मुर्ती श्री.आबेद चाऊस सप्त्नीक संपूर्ण कुटुंबासह उपस्थित होते. तसेच समन्वयक प्रा.डॉ.सुनिल जाधव, कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे, माजी प्राचार्य डॉ.शौकत सय्यद, प्रा.डॉ.भास्कर आहिरे, प्राचार्य पठाण, श्री. शहाजी जाधव सह आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या गौरव समारंभाचे प्रस्ताविक विद्यापीठाच्या अधिसभा सदस्या श्रीमती डॉ.कल्पना घारगे यांनी केले. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभ हस्ते श्री.आबेद चाऊस यांचा



संपूर्ण कपडे, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ देवून सप्त्नीक सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्यांची सून श्रीमती जरीन चाऊस व नात कु.इंशरा यांनी मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना श्री. आबेद चाऊस यांनी माजी मंत्री आदरणीय शिवाजीराव दादा व श्री.अमरसिंह(भैय्यासाहेब )पंडित यांचे आभार व्यक्त करून. माझ्या सारख्या एका शेतकरी कुटुंबातील तरुणाला कार्यालयीन अधिक्षक सारख्या महत्वाच्या पदावर काम करण्याची संधी दिली. मी आजन्म त्यांच्या ऋणात राहीन अशी ग्वाही दिली. या प्रसंगी प्रा.डॉ.शौकत सय्यद, प्रा.डॉ.भास्कर आहिरे, प्रा. कल्याण पवार, संस्थेचे लेखापाल श्री.प्रताप हातोटे, सहलेखापाल प्रा. काशीनाथ गोगुले यांनी आपल्या भावना व्यक्त करून त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी श्री.आबेद चाऊस यांच्या प्रशासकीय कार्याबद्दल कौतुक करून त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा एवढा मोठा सेवा गौरव समारंभ होतोय हीच त्यांच्या कार्याची पावती आहे या शब्दात त्यांच्या कार्याचा गौरव केला. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.सदाशीव सरकटे यांनी सर्वांच्या भावनांची योग्य सांगड घालून श्री. आबेद चाऊस यांच्या प्रशासकीय कामाचे अनुभव सांगितले. त्यांच्या सततच्या हसतमुख स्वभावामुळे त्यांनी अनेक प्राचार्या बरोबर चांगले काम केले. असे सांगून त्यांच्या सेवेचा खरा गौरव झाला असल्याचे सांगून, भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या सेवा गौरव समारंभाचे बहारदार सुत्रसंचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले. तर आभार ग्रंथपाल श्रीमती प्रा.ज्योती रकटे(कठारे) यांनी मानले. या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, श्री.आबेद चाऊस यांची मुले, सुना, मुलगी व नातु आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. हा सेवा गौरव समारंभ यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गौरव सोहळा समितीतील सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# स्कूल बस मालकांचा 'ब्रेक' नितीन गडकरींच्या हाती!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे विदर्भ प्रमुख** : शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी स्कूल बस आणि व्हॅन चालक-मालकांनी आपल्या गंभीर समस्या घेऊन आता थेट केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे लक्ष वेधले आहे. एका बाजूला रस्ते सुरक्षेच्या कठोर नियमावलीची गरज असताना, दुसऱ्या बाजूला आर्थिक हलाखी आणि जाचक सरकारी अटींमुळे हा व्यवसाय संकटात सापडला आहे.

**आर्थिक कोंडी:**

१५ वर्षांवरील वाहनांना 'नो एन्ट्री'?:

केंद्र सरकारने २० ऑगस्ट २०२५

च्या अधिसूचनेद्वारे जुन्या वाहनांना पुनर्रनोंदणीची (Re-registration) सवलत दिली आहे, पण परिवहन कार्यालये ही सवलत स्कूल बसेससाठी नाकारत आहेत. मालकांचे म्हणणे आहे की, त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने लगेच नवीन बस घेणे शक्य नाही. "शाळेच्या बसेस इतर वाहनांपेक्षा जास्त चांगल्या स्थितीत ठेवल्या जातात, त्यामुळे त्यांना १५ ऐवजी २० वर्षांपर्यंत पुनर्रनोंदणीची सवलत द्यावी," अशी त्यांची एकमुखी मागणी आहे.

**शाळा-चालकांमध्ये 'तणाव':**

करारनामा पद्धत रद्द करा: सध्या शाळा प्रशासनासोबत करारनामा (Agreement) करणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक शाळा करार करण्यास टाळाटाळ करतात, ज्यामुळे चालक-मालकांना शालेय वाहतुकीचा परवाना मिळवणे कठीण होते.

याऐवजी, केवळ चालकाचे प्रतिज्ञापत्र आणि कठोर नियम व अटींवर शालेय वाहतुकीचा दर्जा देण्याची मागणी जोर धरत आहे.

'चारित्र्य प्रमाणपत्र'ची अनावश्यक अट: स्कूल बस परवान्यासाठी चारित्र्य प्रमाणपत्र (Character Certificate) सादर करण्याची अट तात्काळ रद्द करावी, अशीही त्यांची मागणी आहे. या अटी अनावश्यक असून त्यातून केवळ कागदपत्रांची किचकट प्रक्रिया वाढत असल्याचा त्यांचा दावा आहे.

**गडकरींनी लक्ष घालावे:**

या संवेदनशील प्रश्नांवर नितीन गडकरी यांनी वैयक्तिक लक्ष घालून शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि चालक-मालकांची आर्थिक स्थिती यांचा समन्वय साधणारा त्वरित निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या मागण्यांवर परिवहन मंत्रालय कोणती भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# "कुत्र्यात मैत्री माणसात भीती"

## माणसाने हरवलेली माणुसकी प्राण्यांमध्ये दिसली

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : माणसांपेक्षा प्राण्यांमध्ये सुरक्षितता?लहान मुलगी सात–आठ कुत्र्यांसोबत खेळताना दिसली; समाजाला मोठा संदेश एका लहान मुलीचा सात–आठ कुत्र्यांसोबत खेळतानाचा व्हिडिओ /फोटो समोर आला असून, या हृदयस्पर्शी दृश्याने समाजात मोठी चर्चा रंगली आहे. मुलगी कधी कुत्र्यांच्या पाठीवर बसून खेळताना दिसते, तर कधी त्यांच्यामध्ये धावताना, त्यांना कुरवाळताना दिसते. विशेष म्हणजे, या कुत्र्यांपैकी एकाही कुत्र्याने मुलीला त्रास दिला नाही किंवा इजा करण्याचा प्रयत्न केला नाही. उलट, ते सर्व तिच्याभोवती संरक्षक भावनेने वर्तणूक करत असल्याचे स्पष्ट दिसते.मानवी समाजात मुलांवरील अन्याय, अत्याचार, फसवणूक यांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ही घटना पाहणाऱ्यांच्या मनात एकच प्रश्न उमटतो"मुलगी प्राण्यांमध्ये सुरक्षित… पण माणसांमध्ये का नाही?"या घटनेने




समाजातील बदलत्या मानसिकतेवर, संवेदनशीलतेवर आणि मानवी मूल्यांच्या क्षयावर चिंतन करण्याची वेळ पुन्हा एकदा आणली आहे.निरागसतेवर प्राण्यांचा कोमल लळा.या कुत्र्यांमध्ये मुलीबद्दल कोणताही आक्रमकपणा दिसला नाही. उलट तिच्या प्रत्येक हालचालीकडे ते लक्ष देत होते. मुलगी त्यांच्या जवळ निश्चिंतपणे बसते, खेळते आणि तेही तिच्या भोवताली शांत व प्रेमळ वृत्तीने वावरतात. हे दृश्य पाहून अनेकांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया दिल्या"प्राण्यांमध्ये अजूनही माणुसकी आहे!"

"माणसांनीही या प्राण्यांकडून निष्ठा व प्रेम शिकावं!"

मुलांसाठी सुरक्षित समाजाची गरज. या घटनेतून समाजाला मिळणारा सर्वात मोठा संदेश म्हणजे मुलांच्या सुरक्षिततेची हमी देण्याची जबाबदारी माणसांनी उचलली पाहिजे.जर एका लहान मुलीला प्राण्यांच्या गटात भीती वाटत नाही, पण माणसांविषयी तीच खात्री देता येत नसेल, तर हा समाजासाठी गंभीर आत्मपरीक्षणाचा क्षण आहे.

मुलांच्या संरक्षणासाठी कुटुंब, शाळा, स्थानिक प्रशासन व समाज यांनी एकत्रितपणे कार्य करण्याची आवश्यकता आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. मुलांच्या निरागस मनाचा गैरवापर करण्यापेक्षा, त्यांच्या सुरक्षित व स्वच्छंद वाढीसाठी सुरक्षित वातावरण देणे हीच खरी समाजसेवा असल्याचेही अनेकांनी नमूद केले.सोशल मीडियावर मोठी चर्चा

ही घटना समोर आल्यानंतर नेटिझन्समध्येही मोठी चर्चा सुरू आहे. काही जण म्हणाले

"माणसांकडून जिथे विश्वासघात होतो, तिथे प्राणी मात्र निस्सीम प्रेम देतात." "समाजाने बदलायला हवं, नाहीतर पुढची पिढी माणसांपासून दूर आणि प्राण्यांमध्ये भरोसा शोधेल."""समाजाला आरसा दाखवणारी घटना"ही घटना केवळ प्राण्यांवरील प्रेमाची नाही, तर प्राणी व माणूस यांच्या वर्तनातील फरक दाखवणारी ठळक उदाहरण आहे.प्राण्यांमधील निस्वार्थ प्रेम, निष्ठा आणि रक्षणाची वृत्ती आजही कायम आहे. मात्र माणसांनी या मूल्यांची पुन्हा आठवण ठेवण्याची गरज आहे.मुलगी प्राण्यांत सुरक्षित; माणसांत नाही – हा संदेश समाजाला जागं करणारा आहे.

# गोंदियात आजाद समाज पार्टी (कांशीराम) व भीम आर्मीचा दमदार प्रवेश!

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी गोंदिया** : प्रभाग क्रमांक 8 मध्ये विजयी झेंडा फडकवण्याचा निर्धार — "आमचे दोन्ही उमेदवार हमखास विजयी" : जिल्हा महासचिव प्रशांत गजभिये

गोंदिया : आगामी नगरपरिषद निवडणुकीत आजाद समाज पार्टी (कांशीराम) व भीम आर्मीने प्रभाग क्रमांक 8 मध्ये आपल्या उमेदवारांची ताकद दाखवत जोरदार पल्ला टाकला आहे. प्रभागातील सामाजिक, शैक्षणिक



व सर्वसामान्य मतदारांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी पक्षाने येथे उमेदवार उभे करून निवडणूक रंगतदार करण्याची तयारी केली आहे.

आजाद समाज पार्टी (कांशीराम) चे जिल्हा महासचिव प्रशांत गजभिये यांनी विश्वास व्यक्त करत सांगितले की,"आमचे दोन्ही उमेदवार हमखास निवडून येतील. गोंदिया नगरपरिषदेत बहुजन, वंचित व सर्वसामान्यांच्या हक्काचं प्रतिनिधित्व करण्यासाठी जनता बदलाची मागणी करत आहे. आणि हा बदल आजाद समाज पार्टी आणि भीम आर्मीच देऊ शकतात."गोंदिया शहरातील प्रभाग क्रमांक 8 मध्ये पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सुरुवातीपासूनच घराघरात जाऊन जनसंपर्क मोहीम वेगाने राबवली असून नागरिकांमध्येही उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. स्थानिक समस्या, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्त्यांची दुरवस्था, गरीब जनतेच्या घरकुल ची समस्या,महिलांना व युवकांना रोजगाराच्या संधी या महत्त्वाच्या मुद्द्यांवर पक्षाने भक्कम आराखडा जाहीर केला आहे.

गजभिये पुढे म्हणाले, "ही निवडणूक फक्त उमेदवारांची नाही, ही वंचितांच्या हक्काची लढाई आहे. प्रभाग क्रमांक 8 मधील जनता सकारात्मक बदलासाठी तयार आहे आणि आम्हीही जनतेच्या प्रत्येक प्रश्नाला न्याय देण्यासाठी वचनबद्ध आहोत."

गोंदियातील राजकीय समीकरणात प्रभाग क्रमांक 8 आता सर्वांचे लक्ष वेधून घेत असून आजाद समाज पार्टी (कांशीराम) व भीम आर्मीचे उमेदवार या निवडणुकीत प्रबळ दावेदार ठरत आहेत.

# २६,२१४ मतदारांच्या हाती उरण नगराध्यक्ष पदाची खुर्ची

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : उरण नगरपालिकेची निवडणूक खऱ्या अर्थाने रंगतदार होणार आहे.नगराध्यक्षपदाचे ४ तर नगरसेवक पदाच्या २१ जागांसाठी ४८ उमेदवार मैदानात उतरले आहेत.

नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजपच्या शोभा कोळी शहा, रूपाली ठाकूर,( शिवसेना शिंदे गट) आणि नसरीन शेख (अपक्ष) तसेच महाविकास आघाडीच्या उमेदवार भावना घाणेकर (राष्ट्रवादी शरद पवार गट)या नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवत आहेत. उरण मध्ये भाजप महाविकास आघाडी शिवसेना शिंदे गट अशी तिरंगी लढत निर्माण होणार आहे. महाविकास आघाडी कडून उरण शहरातील स्थानिक प्रश्न यामध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहाचा अभाव, पाणी पुरवठा,



अस्वच्छ पाणी, रस्त्यांची दुरावस्था, वाहतूक कोंडी, कचरा व्यवस्थापन, आरोग्य सुविधा, पार्किंग कर प्रणाली हे मुख्य मुद्दे प्रचाराचे आहेत तर भाजपकडून शहरातील रस्ते ,फुल मार्केट, आंबेडकर भवन, नगरपरिषद इमारत इत्यादी विकास कामांवर भर दिला जाणार आहे.यावर्षी उरण नगरपालिकेचे भवितव्य २६,२१४ मतदार ठरवणार.

# श्रीवर्धनमध्ये शिवसेना (शिंदे गट) जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी -अनिकेत मोहित :** श्रीवर्धन नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या तयारीला सुरुवात झाली असून, त्याच अनुषंगाने शिवसेना (शिंदे गट) तर्फे नव्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, सचिन पाटेकर, अविनाश कोळंबेकर, प्रितम श्रीवर्धनकर, गणेश मांजरेकर, सुरेश मिरगळ आणि सावन तवासाळकर यांसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यकर्त्यांना संबोधित करताना प्रमोद घोसाळकर यांनी सर्वांनी एकदिलाने काम करून येणारी निवडणूक जिंकण्याचा दृढ संकल्प करावा, असे आवाहन केले. मतदानाच्या वेळी कोणत्याही प्रकारचे क्रॉस वोटिंग होऊ नये, यासाठी त्यांनी ठोस सूचना दिल्या. निवडणुकीनंतर घेतल्या जाणाऱ्या निर्णयांमध्ये कार्यकर्त्यांचाच आवाज महत्त्वाचा राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आणि आमदार भरत गोगावले यांच्या नेतृत्वामुळे श्रीवर्धन शहरावर निधीची कधीही कमतरता येणार नाही. त्यांच्या पुढाकारातून शहरात



आधीच कोटी रुपयांपेक्षा अधिक विकासकामे पूर्ण झाली असून, आगामी काळात विकासाचा वेग आणखी वाढणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे अपक्ष उमेदवार वसंत यादव यांची उपस्थिती. यावर भाष्य करताना घोसाळकर म्हणाले, "आगामी निवडणूक आम्ही वसंत यादव यांच्या नेतृत्वाखाली लढवणार आहोत." त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्त्यांमध्ये अतिरिक्त उत्साह आणि उर्जा निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.

या शुभारंभाने श्रीवर्धनमधील निवडणूक वातावरणाला प्रारंभ मिळाला असून, शिंदे गटाने जोरदार प्रचारयात्रेची दिशा स्पष्ट केली.

# राजमाता जिजाऊ' त्रिभाषिक पुस्तकाचे थाटात प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** पुस्तकाचे प्रकाशन हे तशी असामान्य बाब आहे. त्यातल्या त्यात एकाच वेळी तीन भाषेतून पुस्तक प्रकाशित होणे ही खूपच दुर्मिळ बाब आहे. आमच्या प्रकाशनाच्या पन्नास वर्षांच्या कालखंडात डॉ.संजय गायकवाड यांनी लिहिलेले 'राजमाता जिजाऊ' हे पहिलेच पुस्तक असे आहे जे एकाच वेळेस मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत प्रकाशित होत आहे. या पुस्तकाने जसा तीन भाषेचा विक्रम केला अगदी तसंच या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी रसिक श्रोत्यांनी सुद्धा गर्दीचा विक्रम केला आहे. असे गौरवोद्गार ख्यातनाम साहित्यिक बाबा भांड यांनी या पुस्तकावर बोलताना केले.तत्त्वज्ञान व इतिहासाचे अभ्यासक शरद भिंगारे यांनी या पुस्तकावर नेमके, नेटके आणि विचारप्रवर्तक भाष्य केले. एकाच वेळेस तीन भाषेतून पुस्तक लिहिण्यासाठी भाषाशास्त्राचे ज्ञान लागते. फिक्शन आणि फॅक्ट यांची योग्य विभागणी करणे गरजेचे असते,ते या पुस्तकांने केली आहे असे



ते म्हणाले. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचा प्रसंग हा फिक्शन आहे तर जिजाऊ साहेब दिसायला आणि असायला नितांत सुंदर होत्या ही फॅक्ट आहे,असेही त्यांनी पुस्तकाचा आधार देत कथन केले.

सोहळ्याच्या अध्यक्षा डॉ. स्वाती शिरडकर यांनी प्रत्येक आई जिजाऊ होऊ शकत नाही आणि प्रत्येक मुलगा शिवाजी होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती सांगून आजच्या मातांनी किमान मावळे घडविण्याची भूमिका स्वीकारावी असे मत मांडले. या पुस्तकाच्या शैलीमुळे हे पुस्तक बोधपर गोष्टींचे पुस्तक वाटते, असेही मत त्यांनी नोंदविले.लेखक डॉ. संजय गायकवाड यांनी संपादकीय टीमचे विशेष ऋण व्यक्त करत नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी विद्यार्थीदशा महत्त्वपूर्ण आहे असे मत मांडले.यावेळी सामाजिक कार्यकर्त्या उषा घायतडक,अंबिका टाकळकर आणि डॉ.स्वाती शिरडकर यांचा मातृत्वाचा गौरव म्हणून विशेष सन्मान करण्यात आला.'साकेत प्रकाशन'च्या प्रकाशक प्रतिमा भांड यांनी प्रास्ताविक केले आणि सारंग टाकळकर यांनी सूत्रसंचालन केले.उद्योजक मानसिंग पवार, मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, साहित्यिक डॉ.ऋषिकेश कांबळे, माजी शिक्षणाधिकारी एम.के.देशमुख, कैलास अतकरे,डॉ.रवींद्र बनसोड, साईनाथ जाधव,आकाश साळुंके,विजय द्वारकुंडे,प्रा. मनोज मोकाशे,बी.टी.काळे, सतीश देशमुख,प्रदीप निकम,पी.एम. डहाके,सुभाष निकम,रवींद्र निळ,

डॉ.विलास तायडे,प्रवीण गोळेगावकर, अंकुश मोकाशे, राजेश निकम,रायभान जाधव,आदींसह अनेक ज्येष्ठ साहित्यिकांची उपस्थिती होती.या प्रकाशन सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे मसापचे सभागृह गर्दीने ओतप्रोत भरले होते. रसिकांची गर्दी सर्वच साहित्यिकांच्या आनंदाचा आणि चर्चेचा प्रमुख विषय ठरली.

# पत्रकारांना वर्तमान दिवाळी जाहिराती किती दिल्या यावर ठरणार भावी उमेदवार यांचे भविष्य



**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड** : स्थानिक स्वराज्य संस्था,नगर परिषद यांच्या निवडणूक जाहीर होताच सर्व कार्यकर्ते जोमाने तयारीला लागले, कधीच जनतेचे कोणतेही कामे न केलेले आणि कधी च नेत्यांचे नाव सुद्धा कानावर पडलेले भावी उमेदवार आज काल प्रत्येक ग्रुप वर आपला लांबलचक एक पैशाच्या पोस्टर वर परिचय देऊन आपला जनसेवक म्हणून नावलौकिक मिळवत आहे. पत्रकार यांनी दिवाळी जाहिरात वर्तमान पत्रात प्रसिद्ध करण्यासाठी मागितली असता, कार्यकर्ते यांनी फोन सुद्धा उचलण्यास तयार नव्हते, मी छोटा कार्यकर्ता आहे, मी गरीब आहे, आपण लहान माणसं अशी उडवा उडवी ची उत्तरे मिळाली, आज काल पत्रकारिता करताना चौथा स्तंभ यांना आप आपले दिवाळी जाहिरात टार्गेट पूर्ण करावे लागते, त्यासाठी सर्वच पत्रकार बंधू हक्काने दिवाळी ला सर्व नेते, कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, माजी आमदार, खासदार, सभापती, अध्यक्ष यांना दिवाळी विशेषांक साठी जाहिराती मागतात, पण आम्ही एवढ्या पत्रकार यांना जाहिराती देऊ शकत नाही, एका जणाला दिली की सर्वांनाच जाहिरात दयावी लागते, अशी प्रतिक्रिया मिळाली.आज काल नेते सुद्धा भरपूर झाले मग त्यानुसार पत्रकार यांची सुद्धा संख्या वाढणारच आहे. एखादा कार्यक्रम झाला त्या कार्यक्रम मध्ये स्वतः हजर राहून पत्रकार बातमी तयार करतात, बाहेरगावी असले तर पत्रकार बंधू ना फोन करून बातमी मागवून घेतात व दुसऱ्याच दिवशी बातमी प्रकाशित करतात, एवढे तत्पर पत्रकार असतात, पण काही नेत्यांना किंमत नसते. आज कितीही डिजिटल युग येऊ द्या, व्हाट्स अप, फेसबुक वर नेते प्रसिद्ध होण्याचा प्रयत्न करतात, पण मजा तेव्हाच येते एखाद्या शंभर शब्दाच्या बातमी मध्ये एखाद्या कार्यकर्ता यांचे नाव पत्रकार चमकवतो. ही चौथ्या स्तंभची कार्यतत्परता आहे. एका फोन वर सरपंच, अधिकारी, संचालक,जि. प. सदस्य, नगरध्यक्ष, नगरसेवक, यांची बातमी पत्रकार लावतात पण दिवाळी जाहिरात मागितली तर फोन सुद्धा उचलत नाहीत. निवडून येयाच्या अगोदर म्हणतात एखादे पद येऊ द्या, सत्ता येऊ द्या मग जाहिरात देऊ, अन निवडून आले की म्हणतात मी कोणालाच जाहिराती देत नाही, भरपूर पत्रिका आल्या आहेत, असे सांगतात.प्रत्यक्ष दिवाळी अंक पेपर बघितला असता कोणत्याच नेत्यांनी जाहिराती दिलेल्या नसतात अन जाहिरात मागण्यासाठी गेलं की म्हणतात किती जणांना जाहिराती देऊ इकडे बघितलं तर एकूण दहा पत्रकार यांना सुद्धा जाहिराती दिलेल्या नसतात.पत्रकार छोटा असो की मोठा पण विचाराने निष्पक्ष, निर्भीड, प्रखर मत मांडून बातमी प्रसिद्ध करतो, इचू छोटा असो की मोठा पण दंश केल्यावर विष सारखेच असते एवढे मात्र नक्की. मग अंक असो, यु ट्यूब चॅनेल असो, साप्ताहिक असो, मासिक असो, वर्तमान पत्राची पिडीएफ अंक असो, शेवटी लोकशाही च्या चौथ्या स्तंभ म्हणून पत्रकार यांची ओळख आहे.

जरी पत्रकार गरीब असले तरी विचारांनी श्रीमंत आहेत अनेक नेत्यांना साध्या पत्रकारांनी उच्च पदावर नेले अन नेत्यांनी भ्रस्टाचार करून पद गमावली पण कोणत्या पत्रकार यांनी कधी आपली लेखणी गमावली नाही, स्वतंत्र पणे अगदी बिनधास्त लिखाण करून गोरगरीब जनतेला न्याय देण्याचं कार्य पत्रकार संपादक करतात. अन नेते निवडून आले की पि. ए. यांना फोन उचलण्यास सांगतात, बारा ही महिने पि. ए. च बोलतात की साहेब मिटिंग मध्ये आहेत, सर मुंबई ला गेले, दिल्ली ला आहेत, निरोप कळवतो असे उत्तरे ऐकायला मिळतात, कधी मधी एखाद्या कार्यक्रमात आले तर वेळेवर येतात स्टेज वर बसतात, कार्यक्रम झाला की लगेच ए. सी. गाडीत बसतात कधी जनतेला समस्या विचारणार त्यांना माहित आहे मी निवडून आलो आता जनतेला विसरले तरी काही हरकत नाही. पण खरी जनतेची सेवा करून भर पाण्यात सुद्धा स्वतः हजर राहून, दिवाळी ला गोरगरीब जनतेला कपडे, राशन किट, वाटप करून गरीबाच्या झोपडीत पणती लाऊन त्यांचे जिवन सुखकर करणारे, त्यांच्या चेहऱ्यावर आनंद बघणारे संपूर्ण महाराष्ट्रातील एकमेव आमदार म्हणजे आदरणीय संतोष भाऊ बांगर साहेब यांना मानाचा मुजरा दोनदा गोरगरीब जनतेचा आशीर्वाद घेऊन आमदार झाले यांना म्हणतात समाजसेवा.बघू या निवडणुकीत किती नेत्यांना पद, सत्ता देयाची, खुर्ची कोणाला देयाची याचे 25%तरी पत्रकार यांच्या लेखणीवर अवलंबून आहे.

# उरण हादरवणाऱ्या मोठे भोम येथील खून प्रकरणाचा तपास वेगात

## नातेवाइकांवर संशयाची छाया

**दैनिक युवक आधार**

**उरण / सायली साळुंके :** मोठे भोम गावात ९ नोव्हेंबर रोजी मृत अवस्थेत सापडलेल्या ९० वर्षीय हिराबाई जनार्दन जोशी यांच्या रहस्यमय मृत्यूचा पडदा अखेर दूर होऊ लागला आहे. वयोवृद्ध महिलेला आलेला मृत्यू हा नैसर्गिक नसून, बेदम मारहाणीमुळे झालेली हत्या असल्याचे उरण पोलिसांच्या तपासातून उघड झाले आहे. गावाच्या शांत वातावरणाला हादरवून सोडणाऱ्या या घटनेने उरण तालुक्यात भीतीची छाया पसरली आहे.शवविच्छेदन अहवाल उघड करतो हिराबाई यांच्या शरीरावर टणक वस्तूने वारंवार प्रहार केल्याचे निष्पन्न झाले आहे. डोक्यापासून छातीपर्यंत, तसेच हात-पायांवर खोल आणि गंभीर जखमा आढळल्या. घटनास्थळी सापडलेल्या रक्ताने माखलेल्या दोन तुटलेल्या लाकडी पट्ट्या या



हल्ल्याचे निर्दयी स्वरूप स्पष्ट करतात.

**नातेवाइकांवर संशयाचे सावट**

हिराबाईंनी विकलेल्या चार गुंठे जमिनीतून जवळपास १५ लाख रुपये मिळाले होते. यापैकी पाच ते सहा लाख रुपये नातेवाइकांना दिल्याचे समोर आले असून, पैशांच्या वाटपावरून घरामध्ये वाद निर्माण झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. प्राथमिक तपासात नातेवाइकांपैकीच कुणीतरी या हत्येमागे असण्याची शक्यता अधिक ठळक होत आहे. उरण पोलिसांनी घटनास्थळी मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे अज्ञात आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदवला असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक स्थापन करण्यात आले आहे. तपास अधिकाऱ्यांनी नातेवाइकांची चौकशी गतीने सुरू केली आहे.

परिसरात खळबळ नागरिकांची कारवाईची मागणी या भीषण घटनेमुळे उरण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. वयोवृद्ध महिलेची अशी निर्घृण हत्या झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आरोपींना तातडीने पकडून कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे. मोठे भोम गाव हादरून गेले आहे; पोलिसांच्या तपासाचा वेग वाढला आहे; आणि संपूर्ण तालुका न्याय मिळण्याची वाट पाहत आहे.

## थोडक्यात

### मुलीसह महिला बेपत्ता

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** वर्षीय महिला आपल्या १४ महिन्यांच्या मुलीसह बेपत्ता झाल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. प्रियंकाकुमारी फुटरमल माली ह्या खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून हरवले आहेत. त्यांची उंची चार फूट पाच इंच, रंग सावळा, अंगाने मध्यम आहे. तिला हिंदी आणि भोजपुरी भाषा बोलता येते. त्यांनी सोबत १४ महिन्यांच्या मुलीला नेले आहे. यांच्याबाबत अधिक माहिती असल्यास महिला पोलीस नाईक स्वप्नाली घाडी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### खारघर येथे रोजगार मेळावा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** अतुल म्हात्रे ग्लोबल लर्निंग आणि रिसर्च सेंटर यांच्यातर्फे खारघर विभागातील युवक-युवतींसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन २८ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात आले आहे.या मेळाव्यासाठी शैक्षणिक पात्रता आठवी ते पदवीधर, आयटीआय फिटर, वेल्डर, सीएनसी मेकॅनिस्ट, इलेक्ट्रिशन, डिप्लोमा इंजिनियर असणार आहे. यासाठी आधारकार्ड, पॅन कार्ड आवश्यक आहेत. सत्याग्रह कला, वाणिज्य-विज्ञान महाविद्यालय थारवाणी हेरिटेज, प्लॉट क्र. २४, सेक्टर-७, खारघर येथे मेळावा होणार आहे. या मेळाव्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन अतुल नंदकुमार म्हात्रे यांनी केले आहे.

### सोन्याचे मंगळसूत्र खेचले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पायी चालत जात असलेल्या ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून दोघेजण मोटरसायकल वरून पसार झाले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. श्रेयसी कर्वे (वय 67) या विघ्नेश मेडिकल समोर स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल येथून पायी चालत जात होत्या. यावेळी मोटरसायकल वरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून ते पळून गेले.

### गांजा बाळगल्या प्रकरणी कारवाई

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** गांजा जवळ बाळगल्या प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी एका विरोधात कारवाई केली. अमित गौतम असे या कारवाई करण्यात आलेल्या इसमाचे नाव असून त्याच्याकडे गांजा सापडून आला. त्याला ताब्यात घेण्यात आले.

### ग्राहकाला मारहाण केल्या प्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** मोबाईल दुरुस्तीच्या कारणावरून झालेल्या वादात ग्राहकाला मारहाण केल्याची घटना खारघर मध्ये घडली. या प्रकरणी मोबाईल दुकान चालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.अहमद मनिहार असे आरोपीचे नाव असून जयेश चौधरी यांनी मोबाईल रिपेरिंग साठी आरोपीच्या दुकानात दिला होता. मोबाईल दुरुस्ती वेळेत न झाल्याने चौधरी यांनी कारण विचारले असता आरोपी आणि ग्राहक यांच्यात वाद झाला. यावेळी आरोपीने चौधरी यांना धक्काबुक्की आणि शिवीगाळ केली.

### साबलखेड ते आष्टी नविन रस्त्याला तडे,भेगा ; रस्त्याला दर्जा, मजबुतीच्या नावाने बोंबाबोंब



**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे :** साबलखेड ते आष्टी राज्य महामार्ग रस्त्याचे काम जवळजवळ चार वर्षांपासून कासवगतीने चालू आहे.या राज्य महामार्ग रस्त्यावरील कडा येथील सांगळे गोठा शाळेच्या जवळ नविन रस्त्याला भेगा पडत असुन दोन्ही रस्त्याच्या मध्यभागी थोडी मोठी भेग पडली असून यावरून दुचाकी वाहन घसरून अपघात होऊ शकतात.तसेच पोलीस चौकी व दुध संघ कडा समोर तर रस्ता बनवल्या पासून दूचाकी वाहनांच्या चाकाचे खोलगट पट्टे (वळ) तयार झाले आहेत. त्या पट्ट्या वरून दूचाकी गेली तर अँटोमँटीक दुचाकी वळण घेत आहे व त्यामुळे मोठा उपघात होण्याचा धोका याठिकाणी झाला असून या रस्त्याच्या कामावर कोण लक्ष देणार का ? संबंधित अधिकारी, गुत्तेदार, ठेकेदार यांना जाब विचारून या रस्त्याचा दर्जा, मजबुती सुधारले का ? असे प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

# AcSIR ९ वा दीक्षांत समारंभ व शत्रुघ्न बाजड यांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रिसोड रणजितसिह ठाकूर** : वैज्ञानिक आणि अभिनव संशोधन अकादमी (AcSIR) चा ९ वा दीक्षांत समारंभ २२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९:३० वाजता डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र, नवी दिल्ली येथे संपन्न झाला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे होते डॉ. जितेंद्र सिंह, मा,केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार), ज्यांनी आपल्या भाषणात AcSIR च्या कार्याची कौतुकास्पद माहिती दिली.यावेळी

डॉ. जितेंद्र सिंह म्हणाले, "AcSIR चे वय तरुण असू शकते, पण कर्तृत्व असामान्य आहे — आणि AcSIR हे याचे उज्ज्वल उदाहरण आहे. अल्पावधीतच AcSIR ने दाखवून दिले आहे की सक्षम वैज्ञानिक परिसंस्था असल्यास अत्यंत गुंतागुंतीचे आणि नवे संशोधन आपले तरुण संशोधक आत्मविश्वासाने पूर्ण करू शकतात. यासाठी फक्त योग्य मार्गाची आवश्यकता असते, आणि आज AcSIR भारतातील वैज्ञानिक प्रगतीसाठी तो मार्ग उपलब्ध करून देत आहे."

त्यांनी पुढे सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली शैक्षणिक व संशोधन परिसर अभूतपूर्व प्रमाणात वाढला आहे—७,००० हून अधिक विद्यार्थी आणि ३,००० हून अधिक प्राध्यापक, CSIR, ICMR आणि इतर प्रमुख संस्थांमध्ये सहभागी आहेत. या विशाल नेटवर्कचा आधार घेऊन AcSIR राष्ट्रीय वैज्ञानिक चौकटीच्या केंद्रस्थानी उभा आहे आणि उच्च-गुणवत्तेच्या, उद्योग-संलग्न संशोधनाद्वारे देशाला सतत योगदान देत आहे.

AcSIR ने देशात प्रथमच i-PhD हा नवा अभ्यासक्रम सुरू केला असून, i-PhD मधील 'i' म्हणजे Industry तसेच Imagination आणि Innovation. कल्पना नवप्रवर्तनात रूपांतरित



झाल्यावर उद्योग हा पुढील स्वाभाविक टप्पा ठरतो, आणि यामुळे अनेक तरुण संशोधक आपल्या कल्पना Start-up आणि संशोधनातून राष्ट्रीय संपत्तीमध्ये बदलू शकतात. डॉ. जितेंद्र सिंह यांनी सांगितले की, "भारत चौथ्या स्थानावरून जगातील पहिला विज्ञान व नवप्रवर्तन केंद्र बनण्याच्या दिशेने जात आहे आणि AcSIR सारख्या संस्था या परिवर्तनाचे नेतृत्व करतील. उद्याचा भारत तेजस्वी तरुणांच्या हातात असेल."

या समारंभासाठी उपस्थित मान्यवर म्हणून डॉ. विनोद के. पॉल, सदस्य, नीती आयोग, भारत सरकार

डॉ. स्वाती अजय पिरामल, उपाध्यक्ष, पिरामल ग्रुप प्रो. एन. कलालसेल्वी, महासंचालक, CSIR आणि सचिव, DSIR प्रो. पी. बलराम कुलपती, ACSIR या समारंभात वाशिम जिल्ह्यातील वडजी गावचा सरपंच शत्रुघ्न मधुकर बाजड यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. शत्रुघ्न बाजड हे वडजी येथील सामान्य शेतकरी कुटुंबातील सुपुत्र असून, त्यांनी प्राथमिक शिक्षण वडजी, माध्यमिक शिक्षण हिवरा आश्रम व लेहणी, तर उच्च माध्यमिक शिक्षण शिवाजी कॉलेज, चिखली आणि पुढील एम.एस्सी. (M.Sc.) मायक्रोबायोलॉजी पुणे येथे पूर्ण केले. त्यांनी CSIR-NET, MS-SET, आणि IIT-GATE परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून भारत सरकारकडून शिष्यवृत्ती प्राप्त केली.

शत्रुघ्न बाजड यांनी CSIR-IICT, हैदराबाद येथून पीएच.डी. पूर्ण केली. त्यांनी "अर्षकुथार रस आणि एकांगवीर रस या आयुर्वेदिक औषधांचे प्रयोगात्मक प्राण्यांवर परिणाम" या विषयावर संशोधन केले, जे मिनिस्ट्री ऑफ आयुष (भारत सरकार) अंतर्गत पार पडले. या संशोधनातून आयुर्वेदिक औषधांचे वैज्ञानिक मूल्यमापन करून सुरक्षितता आणि परिणामकारकता सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सामाजिक क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली वडजी गावाने खालील यश संपादन केले:देशातील पहिले १००% प्रौढ BCG लसीकरण करणारे गावदेशातील एकमेव गाव, जिथे Atmospheric Water Generation Unit झेडपी शाळेत बसवली गेली आई-वडिलांची सेवा नाही केली तर वारसा हक्क नाही' असा सामाजिक नियम राबवलापहिले पीएच.डी. धारक सरपंच असलेले गाव म्हणून वडजीचे नाव राज्यभर गाजले हेही तितकेच खरे आहे.

त्यांच्या प्रयत्नांमुळे वडजी गावाने विविध शेती व आरोग्य शिबिरे, जनजागृती मोहिमा आणि सरकारी योजनांचे यशस्वी अंमलबजावणीसाठी पुरस्कार मिळवले आहेत. शत्रुघ्न बाजड यांच्या या यशाबद्दल वडजी ग्रामस्थ, रिसोड तालुका व जिल्हाभरातून अभिनंदन होत आहे, आणि विज्ञान व समाजकार्य यांचा संगम साधणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांचे कौतुक केले जात आहे.

## मालेगाव नगरपंचायत निवडणुकीच्या निमित्ताने न. पं ला 20 लाखाची टॅक्स वसुली



**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**मालेगाव:-** नगरपंचायत मालेगावच्या निवडणुकीच्या निमित्ताने सुमारे वीस लाख रुपये पेक्षा अधिक टॅक्स जमा झाल्याची माहिती नगरपंचायतचे मुख्याधिकारी पंकज सोनवणे यांनी दिली.

मालेगाव नगरपंचायत ची निवडणूक 2 डिसेंबर रोजी होऊ घातली असून त्यासाठी अनेक उमेदवारांनी उमेदवारीसाठी अर्ज दाखल केले आहेत. तसेच त्याच्यासोबतच त्यांच्या अर्जावर सूचक म्हणून सही करण्यासाठी सुद्धा टॅक्स पावती तसेच इतरही कागदपत्राची गरज असते. नगरपंचायत चा टॅक्स जर थकीत असेल तर उमेदवाराचा अर्ज हा रद्द होतो. उमेदवाराचा सूचक त्यांच्या घराची टॅक्स पावती अर्धा सोबत जोडणे आवश्यक असते. त्यामुळे मालेगाव शहरामध्ये सुमारे 260 सूचक आणि उमेदवार यांनी निवडणुकीच्या निमित्ताने टॅक्सचा भरणा केला आहे. यामध्ये वीस लाख अपेक्षाही अधिक टॅक्स या दहा दिवसात जमा झाल्याची माहिती नगरपंचायत च्या वतीने देण्यात आली. उमेदवाराला आपला अर्ज भरते वेळेस आपल्या घराचा आठ अ (प्रॉपर्टी कार्ड) तसेच थकबाकी नसल्याचा दाखला, आणि टॅक्स पावती हे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे गेल्या आठ ते दहा दिवसांमध्ये इच्छुक उमेदवारांनी त्याच्या स्वतःच्या टॅक्स आपला सूचक जो असेल त्याच्याही टॅक्स स्वतःच्या खिशातून भरण्याची माहिती आहे. हे सर्व कागदपत्र बंधनकारक असल्यामुळे मालेगाव नगरपंचायत मध्ये टॅक्स भरण्याची झुंबड उडाली होती. त्यामुळे नगरपंचायतने सुद्धा सकाळी नऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत आपले कार्यालय एवढे ठेवून संबंधित उमेदवारांना सर्व कागदपत्राची व्यवस्था त्वरित केली. त्यासाठी करनिरक्षक अरुण समुद्रे, कर्मचारी विठ्ठल चोपडे व अविनाश काटेकर तसेच आरोग्य निरीक्षक किशोर पंडित यांनी प्रचंड मेहनत घेतली नगरपंचायतचे सीईओ पंकज सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही वसुली झाल्याची माहिती आहे. मालेगाव नगरपंचायत चा सुमारे दीड कोटी टॅक्स थकीत असून त्यापैकी 20 लाख रुपये गेले आठ ते दहा दिवसांमध्ये जमा झाल्याने समाधान व्यक्त होत आहे.

## श्रीवर्धनमध्ये विकासाच्या गतीस चालना; पक्ष प्रवेश सोहळ्यात विविध कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित :** गेल्या पंधरा वर्षांत श्रीवर्धनमध्ये झालेल्या बहुआयामी विकासकामांच्या आधारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तालुक्याच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचा उल्लेख करत, आगामी काळातही श्रीवर्धनचा सर्वांगीण विकास वेगवान करण्यासाठी नागरिकांनी साथ द्यावी, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी केले.

ते श्रीवर्धन मोहल्ला येथे आयोजित पक्ष प्रवेश सोहळ्यात बोलत होते.

खासदार तटकरे म्हणाले की, पर्यटन क्षेत्रात झालेल्या सकारात्मक बदलांमुळे स्थानिकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या असून, श्रीवर्धनचा समुद्रकिनारा आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवू लागला आहे.

विविध राज्यांमधील पर्यटक येथे मोठ्या प्रमाणात आकर्षित होत असल्याने आर्थिक क्रियाशीलतेलाही चालना मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास महिला व बालविकास मंत्री



अदिती तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष दर्शन विचारे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जितेंद्र सातनाक, माजी आमदार तुकाराम सुर्वे तसेच नगरसेवक पदाचे उमेदवार उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील जुनेद दुस्ते, शोहेब हमदुल्ले, इरफान सोनाले, सलमान सोनाले यांसह अनेक कार्यकर्त्यांनी खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

मंत्री अदिती तटकरे यांनी यावेळी गेल्या सोळा वर्षांमध्ये श्रीवर्धनमध्ये राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांची माहिती उपस्थितांना दिली.

## पनवेल महानगरपालिका परवाना विभागामार्फत व्यवसाय पर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार गुरूवारी 20 नोव्हेंबर 2025 रोजी हिरानंदानी, खारघर परिसरात पनवेल महानगरपालिका परवाना विभागामार्फत व्यवसाय परवाना शिबीराचे आयोजन करण्यात आले.

पालिका क्षेत्रातील छोटे-मोठे व्यावसायिकांना परवाना मिळविण्यासाठी वारंवार पालिका कार्यालयात येण्याची व रांगेत उभे राहण्याची गरज भासू नये, यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. नागरिकांनी एकाच ठिकाणी अर्ज सादर करून, कमीत कमी आवश्यक कागदपत्रे प्रदान करीत त्याच दिवशी व्यवसाय परवाना मिळावा यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने उपायुक्त रविकिरण घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष शिबीराचे आयोजित करण्यात आले.

या शिबीरास व्यावसायिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. यावेळी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर केलेल्या व्यवसायिकांना तात्काळ व्यवसाय परवाना देण्यात आला.

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना तात्काळ व्यवसाय परवाना देण्यासाठी महापालिकेच्या अधिकृत वेबसाईटवरती 'नागरीकांची सेवा' या विभागामध्ये लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच व्यवसायिकांना https://trade-panvelmc.org/ या लिंकद्वारे अर्ज सादर करुन व्यवसाय परवाना प्राप्त करुन घेता येईल असे उपायुक्त रविकिरण घोडके यांनी सांगितले आहे.

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नारा येथे होणाऱ्या हिंद-की-चादर कार्यक्रमस्थळाचे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर**

**नागपूर :** शिख धर्माचे नववे गुरु श्री गुरू तेग बहादूर साहिब यांच्या 350 व्या बलिदान दिनानिमित्त येत्या 7 डिसेंबरला नारा येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हिंद-दी-चादर या कार्यक्रमासाठी सुमारे 5 लाख भाविक अपेक्षित असून त्यांच्यासाठी विविध सेवाने परिपूर्ण असलेल्या भव्य मंडप व कार्यक्रम स्थळाचे भूमिपूजन राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी आमदार टेकचंद सावरकर, कार्यक्रमाचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक, माजी नगरसेवक विक्की कुकरेजा, मनपाचे उपायुक्त राजेश भगत, अशोक गराटे, हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर 350 व्या शहिदी समागम राज्यस्तरीय समितीचे विदर्भ अध्यक्ष सरदार गुरुमितसिंग खोक्कर, महेंद्र राजपूरा, प्रीतपाल सिंग भाटीया, सुनील मुलगावकर, सुखविंदर सिंघ डिल्लोन (सोनू महाराज), जसपाल सिंग सिंधू, परमजित सिंग भट्टी, गजेंद्र सिंग लोहिया, गुरदयाल सिंग पड्डा, मलकित सिंह बल, टिटू ढिल्लो, प्रितपाल



सिंग भाटीया, समस्त शिख, सिकलगार, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांनी सत्य, संयम, मानवता, करूणा आणि धैर्य या मूल्यांचा अमूल्य संदेश दिला. त्यांच्या 350 व्या बलिदान वर्षा निमित्त महाराष्ट्र शासन आणि हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर 350 व्या शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या संयुक्त विद्यमाने 7 डिसेंबर रोजी नारा येथील सुरेश चंद्र सुरी मैदानात येथे भव्य समारोह आयोजित करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या समवेत अनेक मान्यवर कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

भूमीपूजन समारंभानंतर जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमासाठी नियुक्त केलेल्या समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत आरोग्य, सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, परिवहन याबाबत चर्चा करण्यात आली.

7 डिसेंबर रोजी होणाऱ्या या भव्य कार्यक्रमात कथा, कीर्तन आणि प्रवचनाचा लाभ भाविकांना होणार आहे. भाई मनप्रीत सिंह, भाई अमरजीत सिंह, भाई चमनजीत सिंह, भाई जगतार सिंह, बीबी दलेर कौर, तरनजीत सिंह, संत ज्ञानी हरनाम सिंह, बाबा संत सिंह आदी मान्यवर प्रामुख्याने मार्गदर्शन करणार आहेत.

## वैदर्भियांचा २९ नोव्हेंबर रोजी खारघरमध्ये स्नेहमिलन सोहळा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** नोकरी, व्यवसायानिमित्त आपापल्या गावांपासून शेकडो किलोमीटर दूर आलेल्या मुंबई आणि नवी मुंबईतील विदर्भवासियांचा यांचा खारघर येथे चौथा स्नेहमिलन सोहळा 'आपला विदर्भसामाजिक-सांस्कृतिक संस्था'तर्फे आयोजित करण्यात आला आहे.खारघर, सेक्टर-१२ येथे उत्कर्ष हॉल येथे २९ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६ ते रात्री १० दरम्यान सदर स्नेहमिलन सोहळा पार पडणार आहे. चंद्रपूर, गडचिरोली ते बुलढाणा पर्यंत पसरलेल्या विदर्भातील सर्वच जिल्ह्यातील हजारो वैदर्भीय नवी मुंबई आणि मुंबईत राहत आहेत. मात्र, त्यांची प्रभावी संघटना नसल्याने वैदर्भियांचे सांस्कृतिक आणि इतर कार्यक्रम या परिसरात पार पडत नाही. त्यामुळे आपल्या गावांपासून खूप दूर आलेल्या मराठी माणसांना आपली बोली भाषा, आपल्या खाद्य आणि जीवनशैलींवर आधारित समारंभांची उणीव सतत भासत असते. सदर उणीव दूर करण्यासाठी या परिसरातील वैदर्भियांनी एकत्र येऊन 'आपला विदर्भ' संघटना ३ वर्षांपूर्वी स्थापन केली आहे.

**गुणवंतांचा, कर्तुत्ववान व्यक्तींचा सत्कार...**

या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी, क्रीडापटू, आपली नोकरी आणि व्यवसायात कर्तुत्व गाजविलेल्या व्यक्तींचाही सत्कार करण्यात येणार आहे. तसेच नृत्य, गायन आदि कलाप्रकार सादरीकरणाच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जाणार आहेत. या कार्यक्रमासाठी उपस्थित प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा परिचय करून देता यावा, यासाठी एक विशेष परिचय सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. विदर्भातील लोकप्रिय सावजी भोजनाचीही खास व्यवस्था याप्रसंगी करण्यात आली आहे. या कार्यक्रमास अधिकाधिक संख्येने वैदर्भियांनी उपस्थिती लावावी, असे आवाहन 'आपला विदर्भ संस्था'चे अध्यक्ष ॲड. विजयकुमार कोहाड आणि सरचिटणीस प्रमोद चुंचूवार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कोहाड (९९६९२३८१५०) आणि सचिव-राजेंद्र नंदनकर (९९६७२२३८९०) या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन 'संस्था'तर्फे करण्यात आले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पैलवान तानाजी चवरे (अप्पा) यांच्या वाढदिवसानिमित्त पैलवान शंकर (अण्णा) पुजारी यांना महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्कार 2025 देऊन सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** साळशिरंबे तालुका कराड येथे पैलवान तानाजी चवरे (आप्पा) यांच्या वाढदिवसानिमित्त १५ नोव्हेंबर २०२५ रोजी पै. शंकर (अण्णा) पुजारी कोथळीकर यांना महाराष्ट्र जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कराड दक्षिणचे आमदार अतुल भोसले (बाबा) मा.आमदार आनंदराव पाटील (नाना) मा. विराज नाईक मा.आर टी स्वामी साहेब पै. धनंजय पाटील कुस्ती संघटक पै.तानाजी चवरे (आप्पा) मा. बाळासाहेब पाटील- टाळगावकर



कामगार केसरी पै.सचिन बागट पै. प्रवीण थोरात इ. मान्यवर मंडळी उपस्थित होते

ज्येष्ठ कुस्ती निवेदक

श्री. शंकरराव बापूसाहेब पुजारी

मूळगाव :— कोथळी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील उज्ज्वल कुस्ती परंपरेने नटलेल्या कोथळी गावातील बापूसाहेब कारभारी यांच्या सुसंस्कृत शेतकरी कुटुंबात आपला जन्म झाला. लहानपणापासून कुस्तीची अविरत ओढ मनामध्ये असल्याने गावातील मंगेश्वर तालमीतून कुस्तीला सुरुवात झाली. सांगलीच्या सरकारी तालमीत अनेक नामवंत वस्तादांच्या मार्गदर्शनाखाली पैलवान म्हणून आपली भक्कम जडणघडण झाली आणि असंख्य मैदाने आपण आपल्या दमदार खेळीने गाजवली.

कुस्ती निवृत्तीनंतरही कुस्ती क्षेत्राची सेवा करण्याचा संकल्प करून आपण निवेदनाच्या माध्यमातून कुस्तीस नवी वाट दिली.

त्या काळात कुस्तीची प्रसिद्धी कमी, परिस्थिती प्रतिकूल आणि कुस्ती मुकी होती. त्या 'मुकी कुस्ती'ला आपल्या प्रभावी आवाजाने, ज्ञानाने, इतिहासाच्या शिदोरीने आणि शब्दांच्या ताकदीने बोलकं केलं.

आपल्या वाणीतून प्रेक्षकांना कुस्तीचे बारकावे, पैलवानांची माहिती, वस्तादांचे योगदान, तालीमींचा इतिहास जिवंतपणे समजला. क्रिकेटपुरती मर्यादित असणारी कॉमेंट्री आपण पहिल्यांदा कुस्तीच्या मैदानात आणली आणि कुस्तीला नवा श्वास, नवी दिशा, नवे वैभव मिळवून दिले.सरस्वती मातेच्या वरदहस्ताने लाभलेल्या आपल्या वाणी-कौशल्यामुळे महाराष्ट्राच्या कुस्तीला खरी संजीवनी प्राप्त झाली. आजच्या कुस्तीच्या वैभवात आपला सिंहाचा वाटा असून कुस्ती रसिकांच्या हृदयात आपले स्थान अढळ आहे.

आज कराड तालुका कुस्ती संघ कला क्रीडा सांस्कृतिक ट्रस्ट यांच्या वतीने पै. तानाजी चवरे (आप्पा साळशिरंबेकर) यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कुस्ती मैदानात आपल्या कार्याचा, योगदानाचा व दैदिप्यमान वाटचालीचा मानपूर्वक गौरव करण्यात येत आहे. अण्णा, आपले मन:पूर्वक अभिनंदन आपले मार्गदर्शन व आशिर्वाद कुस्ती क्षेत्रावर सदैव राहो, हीच मनोकामना. कराड तालुका कुस्ती संघ व कला क्रीडा सांस्कृतिक ट्रस्ट महाराष्ट्र राज्य.

## श्री छत्रपती मुलींचे हायस्कूल मध्ये बाल आनापान सती शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : श्री छत्रपती मुलींचे हायस्कूल भवानीनगर व श्री छत्रपती मुलांचे हायस्कूल भवानीनगर येथे बारामती विपश्यना समितीच्या वतीने बाल आनापान सती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात दोन्ही शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. बारामती विपश्यना समितीच्या वतीने बाल शिबिर शिक्षक राजेश प्रधान सर धम्म सेवक विजय सुपेकर ( विश्वस्त बारामती विपश्यना समिती) पुष्पल मोरे अनंत भोसले सर महेश झेंडे काम पाहिले.यावेळी या शिबिरात विद्यार्थी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापिका गोरे मॅडम व शिक्षक यांनी सहभाग घेतला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय थोरात सर यांनी केले.मित्र उपक्रम हा महाराष्ट्र शासन व विपश्यना संशोधन संस्था (VRI) आणि सर्व विपश्यना ध्यान केंद्र



यांचा एक संयुक्त कार्यक्रम आहे.आनापानच्या नियमित सरावाद्वारे सुयोग्य रीतीने मनाची जागृकता आणि एकाग्रता वाढवून त्याच्या आधारे बाल-वयातच विद्यार्थ्यांचा सर्वांगिन मानसिक, बौद्धिक, गुणवत्ता आणि व्यक्ती विकास घडवून आणणे हा मित्रउपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

## शास्त्री फार्मसीत राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेचे भव्य आयोजन

**दैनिक युवक आधार**

**एरंडोल प्रतिनिधी स्वप्नील पाटील** : दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी पळासदळ, ता. एरंडोल येथील शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी यांच्या वतीने राज्यस्तरीय फार्मसी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. राज्यातील विविध महाविद्यालयांमधून आलेल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून स्पर्धेला विशेष रंगत आणली.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे उपप्राचार्य डॉ. पराग कुलकर्णी तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. स्पर्धेत फार्मास्युटिकल सायन्स, क्लिनिकल नॉलेज, जनरल सायन्स आणि लॉजिकल स्किल्स या विषयांवर आधारित प्रश्नोत्तर फेऱ्या घेण्यात आल्या. प्रत्येक फेरी ज्ञानवर्धक, रोमहर्षक आणि चुरशीची ठरल्याने प्रेक्षकांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

परीक्षक मंडळाने निष्पक्ष, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने परिक्षणाची जबाबदारी पार पाडली. अंतिम फेरीत पोहोचलेल्या संघांनी उत्कृष्ट कामगिरी सादर करत स्पर्धेची उंची अधिक वाढवली.

**विजेत्यांचा गौरव**

**डी. फार्मसी गट**

प्रथम क्रमांक: गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक, जळगाव (फार्मसी विभाग) — अक्षत लोहार व मयुरेश बाजारे



द्वितीय क्रमांक: एसएसबीटी, बांभोरी — भावेश सूर्यवंशी

शास्त्री इन्स्टिट्यूट, एरंडोल — नर्गिस शाह (संयुक्त)

**बी. फार्मसी गट**

प्रथम क्रमांक: श्री गुलाबराव देवकर कॉलेज ऑफ फार्मसी, जळगाव — रिषभ सोनावणे व ओम वानखेडे

द्वितीय क्रमांक: शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी — नाझनीन सय्यद व तेजस्विनी पाटील

विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्याचा मान प्राचार्य डॉ. विजय शास्त्री व डॉ. पराग कुलकर्णी यांना लाभला.कार्यक्रमाच्या यशामागे महाविद्यालयातील शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे उल्लेखनीय योगदान राहिले.

संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा. अनुप कुलकर्णी यांनी पार पाडले. तसेच प्रा. दिग्विजय पाटील, प्रा. सुमेश पाटील, प्रा. श्रद्धा शिवदे, प्रा. कीर्ती पाटील यांच्यासह सर्व शिक्षकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी स्वयंसेवकांनी मनापासून सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला.

## शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त तळोजा फेज 2 येथील बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेजमध्ये बी. ए . एल. एल. बी, एल एल. बी, एल. एल. एम च्या प्रथम वर्षाच्या विदयार्थ्यांचे स्वागत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर )** : शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त तळोजा फेज 2 येथील बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेजमध्ये बी. ए . एल. एल. बी, एल एल. बी, एल. एल. एम च्या प्रथम वर्षाच्या विदयार्थ्यांचे स्वागत (वेलकम) कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी पनवेल सेशन कोर्टाचे न्यायाधीश मा. श्री. कोठलीकर , जिल्हा सरकारी वकील अलिबागचे अॅड पवार पनवेल कोर्टाचे सरकारी वकील अॅड. भोपी पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड, मनोज भुजबळ . बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. शिनगारे , बबनदादा पाटील कॉलेज ऑफ फिजओथेरेपीचे



प्राचार्य डॉ. मनोज अग्निहोत्री , बबनदादा पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्राचार्य सौरभ खेडेकर , एस. व्ही. सिनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. राहुल कांबळे , दि. इलाईट पब्लिक स्कूल स्टेट बोर्डचे प्राचार्या डॉ. सौ. अलका कळसी, दि. इलाईट पब्लिक स्कूल सी. बी. एस. इ शाळेच्या प्राचार्या डॉ. सौ अर्थप्रिया काका, बी. के. पाटील ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य श्री. गोधळी सर, कै. कमलू पाटील माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. बोराटे , अ. बी. पाटील माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य गोडबोले कॉलेजचे सर्व विदयार्थी प्राध्यापक, शिक्षक उपस्थित होते. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष व शिवसेना उपनेते बबनदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी संस्थेचे संचालक गणेश पाटील व संचालक कैलास पाटील, संचालक स्मित भोईर, सेवानिवृत्त प्राचार्य काकेकर, उपस्थित होते.

## सेलू नगर परिषद निवडणूक : प्रचाराची रणधुमाळी सुरू, उमेदवारांच्या गाठीभेटींना वेग

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार :** सेलू नगर परिषद निवडणुकीचे शहरात राजकीय वातावरण तापू लागले असून प्रचाराची रणधुमाळी जोर धरू लागली आहे. उमेदवारांनी आपल्या आपल्या प्रभागांत सकाळपासून उशिरापर्यंत मतदारांशी थेट संपर्क साधण्यावर भर दिल्याने गाठीभेटींना मोठ्या प्रमाणात वेग आला आहे.प्रभागनिहाय फेरफटका, घरोघरी संपर्क, लहानमोठ्या बैठका, तसेच स्थानिक समस्यांची जाण करून घेण्याचा प्रयत्न अशा माध्यमातून प्रचाराची दिशा आखली जात आहे. काही उमेदवार तर पहाटेच प्रचारमोहीम सुरू करून संध्याकाळी उशिरापर्यंत



मतदारांशी संवाद साधताना दिसत आहेत.

शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, विकासकामे आणि नागरिकांच्या दैनंदिन प्रश्नांवर चर्चा रंगत असून प्रत्येक उमेदवार आपापली दृष्टी आणि कामाचा आराखडा मांडताना दिसतो. यामुळे मतदारांमध्ये निवडणूक उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

दरम्यान, समर्थकांकडून सोशल मीडियावरही प्रचाराचा जोर वाढला असून पोस्टर्स, व्हिडिओज, संदेश प्रति-दिवस व्हायरल होत आहेत. काही ठिकाणी तर तरुणांची विशेष टीम उमेदवारांच्या प्रचारात जोश आणताना दिसते.एकूणच, सेलू नगर परिषद निवडणुकीत गाठीभेटी, प्रचारफेऱ्या आणि स्थानिक प्रश्नांवरील चर्चा यामुळे राजकीय तापमान आणखी चढण्याची शक्यता असून आगामी काही दिवसांत प्रचार अधिक रंगतदार होणार, अशी चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

## युनिव्हर्स तायक्वांदो स्पोर्ट असोसिएशन मांगडेवाडी येथील विद्यार्थ्यांचे यश

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर** : उद्योग महर्षी उदयसिंग शंकरराव मोहिते - पाटील यांच्या जयंतीनिमित्त युथ स्पोर्ट्स चॅम्पियनशिप २०२५ आयोजक युथ स्पोर्ट एज्युकेशन असोसिएशन महाराष्ट्र अकलूज येथे भरवण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये युनिव्हर्स तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशन मांगडेवाडी संघाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.

गोल्ड मेडल - ऋग्वेद भोपते, श्रशांत बिराजदार, सार्थक शेलार विनायक घुमटे, वैष्णवी मूल्या, भक्ती पांगारकर , रुद्र भोपते सिल्वर मेडल - सुरज सावंत , शार्दुल



जाधव , विराज कढोलकर, श्रीधर धुमाळ, श्रेया जाधव ब्रांच मेडल शिवराज शिंदे, रिदम कोकाटे, प्रज्वल लडकत.यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन उद्योजक मा.राघवराव माने, मा.बाळासाहेब मांगडे, मा.गुलाबराव पाटील गुलाब फिश कंपनी मा.गफार पठाण सर ,मांगडेवाडी सरपंच मा. अर्चनाताई मांगडे ,उपसरपंच तसेच प्रमुख प्रशिक्षक महेश बाबते ,प्रियांक भोपते,रुद्र भोपते, सुधीर माने ,संतोष शिंदे ,दीपक पाटील, किरण शेलार तसेच पालक वर्ग यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## महिलांनी सामाजिक कार्यासाठी एकत्र यावे – अनिता काळे; राज्यस्तरीय 'महाराष्ट्र समाज भूषण' पुरस्काराने विविध क्षेत्रातील महिला सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती चळवळीला ५० वर्षे पूर्ण झाल्याने सृष्टी बहुउद्देशीय सेवा भावी संस्थेने विविध क्षेत्रात कार्यरत महिलांना 'राज्यस्तरीय महाराष्ट्र समाज भूषण पुरस्कार २०२५' सन्मान सोहळा पुणे येथील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवनात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, त्यागमूर्ती रमाई आंबेडकर, माई सिंधुताई सपकाळ यांच्या प्रतिमांसमोर पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षा सौ. मिनाक्षी डोंगरे यांनी प्रमुख पाहुण्या डॉ. स्मिता बारवकर यांचे स्वागत केले.अनिता काळे, सौ. संगीता शिंदे, सुवर्णा इंगोले, मीरा पाटील, सौ. नंदा डेरे, डॉ. सुजाता कोठाळे या मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. संस्थेचे प्रस्ताविक कु. श्रेया साळवे यांनी मांडले.

डॉ. स्मिता बारवकर यांनी 'महिलांनी वाचन करून प्रगल्भ विचार अवलंबून सक्षम व्हावे' असा आवाहन केले तर सुवर्णा इंगोले यांनी स्त्रियांना विकासाच्या समान संधी मिळणे गरजेचे असून, स्त्रियांवरील मानसिक आणि शारीरिक अत्याचारांविरुद्ध जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला. सौ. नंदा डेरे यांनी 'स्त्री ही चैतन्यशक्ती आहे, आपण स्त्रियांना लक्ष्मी मानतो' असे मत मांडले.अध्यक्षीय



भाषणात अनिता काळे यांनी 'महिलांनी आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी चांगली जीवनशैली अंगिकारली पाहिजे. महिला म्हणजे कुटुंबाचा कणा आहे. महिलांनी सामाजिक कार्य करण्यासाठी एकत्र आले पाहिजे' असा संदेश दिला. या निमित्ताने विविध क्षेत्रात कार्यरत अनेक महिलांना 'राज्यस्तरीय महाराष्ट्र समाज भूषण पुरस्कार २०२५' देऊन सन्मानित करण्यात आले.

या पुरस्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा मिनाक्षी डोंगरे, उपाध्यक्षा माधुरी साळवे, सचिव भारती एकलारे, संचालक मंडळ सदस्य विकास डोंगरे व अनिल चाटे यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री पुरंदरे व चेतना शर्मा यांनी केले. अखेरीस चेतना शर्मा यांनी उपस्थित सन्मानित पाहुणे आणि पुरस्कारविजेत्यांचे आभार मानले.

## उरण नगरपरिषदेचा मुकाबला तापला; नगराध्यक्ष पदासाठी चौकोनी लढत, २१ जागांसाठी ४८ उमेदवार रिंगणात

**दैनिक युवक आधार**

**उरण । प्रतिनिधी सायली साळुंके :** उरण नगरपरिषद निवडणुकीचे चित्र आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपताच पूर्णपणे स्पष्ट झाले. नगराध्यक्ष पदासाठी अखेर चार उमेदवार मैदानात उभे राहिले असून नगरसेवक पदाच्या २१ जागांसाठी तब्बल ४८ उमेदवारांचे अंतिम रिंगण निश्चित झाले आहे. पाच उमेदवारांच्या माघारीनंतर आता उरणमध्ये भाजप विरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत रंगणार असून, शिंदे गट आणि अपक्ष उमेदवारांच्या सहभागामुळे अनेक प्रभागांत बहुकोनी स्पर्धा अधिक रंगतदार झाली आहे.

नगराध्यक्ष पदासाठी चौकोनी सामना



भाजपकडून कोळी शोभा भुवन, महाविकास आघाडीकडून घाणेकर भावना कुंदन, शिंदे गटाकडून रुपाली तुषार ठाकूर आणि अपक्ष म्हणून शेख नसरीन इसरार—या चौघींमधील सामना उरणच्या राजकारणात नवे समीकरण निर्माण करणार आहे. महिलांचे वर्चस्व असलेल्या या स्पर्धेत मतांचे गणित अधिकच गुंतागुंतीचे बनणार हे स्पष्ट आहे.

२१ प्रभागांत ४८ उमेदवारांची चुरस प्रत्येक प्रभागात बहुमत मिळवण्यासाठी उमेदवारांची धडपड वाढली आहे. प्रभाग १ ते १० पर्यंत विविध गट, पक्ष आणि अपक्षांनी उमेदवारी निश्चित केली आहे. काही प्रभागांत थेट भाजप विरुद्ध महाविकास आघाडी, तर काही ठिकाणी तिरंगी व चौकोनी लढतींमुळे वातावरण तापले आहे.

२४ तासांपूर्वी माघारीमुळे स्पर्धा काही प्रमाणात सुटसुटीत झाली असली तरी अंतिम रोख आणि मतांचे तिढे अजूनही अनाकलनीय आहेत.


समस्या निकाली काढण्याचेच मोठे आव्हान. शहरातील महिलांसाठी स्वच्छतागृहांचा अभाव, विस्कळीत पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, कचरा व्यवस्थापन, वाहतूक कोंडी, वाढते अपघात, करप्रणाली, आरोग्यसेवा यांसारख्या प्रश्नांवर नागरिकांची नाराजी दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवरची निवडणूक शहराच्या विकासदिशा ठरवणारी महत्त्वाची ठरणार आहे.

उमेदवारांनी प्रचाराची लगबग सुरू केली असून येत्या काही दिवसांत वातावरण आणखी पेटणार असल्याचे चित्र दिसत आहे. कोणाची भूमिका ठरेल निर्णायक, कोण मिळवेल जनतेचा कौल—याकडे उरणचे लक्ष लागले आहे.

## 26 जानेवारीला भंडारा येथील संत तुकाराम सभागृहात संविधान दिन अमृत महोत्सवाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे** : भंडारा-शहरातील संत तुकाराम सभागृह (बावणे कुणबी समाज) पोलीस स्टेशनच्या मागे भंडारा येथे 26 नोव्हेंबर 2025 रोज बुधवार ला दुपारी 1 वाजता संविधान दिन अमृत महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सविस्तर वृत्त असे की, 26 जानेवारी 19 50 ला स्वतंत्र भारताची स्वतंत्र राज्यघटना आपल्या देशात लागू करण्यात आली. त्याला 26 जानेवारी 2025 ला 75 वर्षे पूर्ण झालेली आहेत. या भारतीय राज्यघटनेच्या अमृत महोत्सवानिमित्ताने 26 जानेवारी 2025 ला भारतीय राज्यघटना व नागरिकांची जबाबदारी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे. यावेळी




प्रमुख वक्ते म्हणून डॉ. संजय शेंडे लेखक व संविधान अभ्यासक नागपूर, प्रमुख पाहुणे म्हणून उमेश कोराम संयोजक ओबीसी युवा अधिकार मंच यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहतील. करिता या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन संविधान शाखा यशोदा नगर भंडारा ,शाखाप्रमुख विष्णुदास जगनाडे, डॉ बाळकृष्ण सार्वे, गोपाल सेलोकर,वामनराव गोंधुळे, संजय मोहतुरे, इंजिनियर त्र्यंबकराव घरडे, सदानंद इलमे, ओबीसी सेवा संघ, जनगणना परिषद ,ओबीसी जागृती संघ ,ओबीसी क्रांती मोर्चा युथ फार सोशल जस्टीस भंडारा ,संविधान बचाव संघर्ष समिती भंडारा यांनी केलेले आहे.

# शिवाजी वार्डातील अनेक नागरिक घरकुल पासून वंचित -सौ.विद्या रंगारी

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा :** साकोली येथील-पंचशीलवार्डात व शिवाजी वार्ड अनेकांचे पडक्या अवस्थेत घर आहेत. त्यांच्या झोपड्या आहेत . कित्येकांच्या घरात पाणी जाते. मोठा त्रास सहन करावा लागतो . अनेक नागरिकांनी घरकुल चे फॉर्म भरलेले आहेत. परंतु अजून घरकुल त्यांना मिळालेले नाही. त्यामध्ये अरुण बडोले ,ममता वाहने व इतरही बहुतांशी लोक त्या वार्डामध्ये राहतात. अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते .परंतु अनेकांचे घरकुल मंजूर करत असताना या गरीब लोकांच्या घरकुलांकडे मात्र कानाडोळा



करण्यात आलेला आहे .ते पैसे खर्च करीत नसल्यामुळे व त्यांना माहिती नसल्यामुळे व कोणी मार्गदर्शन करत नसल्यामुळे त्यांचे घरकुलचे काम थंड अवस्थेत रखडलेले आहेत. त्यामुळे त्यांना घरकुलाची अत्यंत आवश्यकता आहे जे सदन आहे त्यांना घरकुल मिळालेला आहे. परंतु गरीब आहेत त्यांना घरकुल मिळालेले नाही असं त्यांच्या आरोप आहे .म्हणून या परिसरात पुन्हा सर्वे करून त्यांना घरकुल कसं मिळवून देता येईल या दृष्टिकोनातून पदाधिकाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी, प्रतिनिधींनी ,लोकप्रतिनिधींनी त्या दृष्टिकोनातून प्रयत्न करावे अशी मागणी माजी महिला जिल्हा संघटक विद्या रंगारी यांनी केली आहे.

# नवोदित अधिकारी व जवानांचा भव्य सत्कार

## आमदार सुरेश(अण्णा )धस यांचा “इमानदारीने काम करा, उच्च शिक्षण घ्या” असा कानमंत्र

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा परीक्षेत यश संपादन करून विविध शासकीय विभागांमध्ये तसेच सैन्य व सुरक्षा दलांमध्ये निवड झालेल्या होतकरू विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास आमदार सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारंभात तेजस रोहिदास भराटे यांची ग्राम महसूल अधिकारी पदी तर शुभम बाळासाहेब माने यांची आरोग्य सेवक पदी निवड झाल्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला. यासह भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या इथापे शंकर सोमीनाथ, दातीर रोहन गोरख, अमन लियाकत खान, देवकर करण विठ्ठल, गवते राहुल सुभाष, आंधळे रोहित रामकिसन, पवार ओंकार बद्रीनाथ, सारगुडे समाधान श्रीधर, कवादे सौरभ अण्णा, प्रथमेश भारत यादव यांच्यासह अनेक जवानांचा सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र पोलिस दलात निवड झालेल्या प्रियंका मल्हारी तांबे, घोडके दत्तात्रय गोरख,



नागरगोजे किशोर शिवाजी तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलात निवड झालेल्या जाधवर चंद्रकांत बंडू, घुमरे दीपक लक्ष्मण, रायकर सिद्धांत रंगनाथ, रूपवर अशोक गवाजी आणि कुदांडे दत्तात्रय जयसिंग यांचाही सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थित जवानांचा गौरव करत आमदार सुरेश(अण्णा) धस म्हणाले,

“२४ तास देशसेवेसाठी सज्ज असलेले जवान म्हणजे जनतेची सुरक्षिततेची खरी ढाल आहेत. नोकरी मिळाल्याने समाधान मानू नका, तर उच्च शिक्षण, प्रामाणिकपणा आणि सातत्य यांचा ध्यास घ्या. वाचन वाढवा आणि उच्च शिखर गाठा.”यावेळी विद्यार्थ्यांसाठी लवकरच अभ्यासिका सुरू करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. कार्यक्रमाला नवनिवडीत अधिकारी, जवान, त्यांचे कुटुंबीय व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कष्ट, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर यश संपादन करून गाव, समाज व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या सर्व गुणवंतांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. राष्ट्रसेवा व समाजसेवेच्या मार्गावर ते अधिक उज्वल यश संपादन करोत, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली.

# आवरे येथील अक्षा गावंड ने साकारली मल्हारगड किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी (विराट पाटील)** : आवरे गावातील जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आवरे मध्ये 9 वित शिकणारी अक्षा उत्तम गावंड हिने साकारली मल्हार गड किल्ल्याची प्रतिकृती लहानपणापासूनच अक्षाला किल्ले बनवण्याची आवड तसेच अभ्यासाव्यतिरिक्त जुडो मार्शल कराटे या मध्ये सुद्धा अग्रेसर असणारी अक्षा ही ला किल्ले बनविण्यात कमालीची रुची आहे सारडे विकास मंच आयोजित किल्ले स्पर्धेमध्ये तिला प्रोत्साहन पर पारितोषिक देऊन गौरविण्यात आले

छत्रपती शिवाजी राजांचा इतिहास हा अलौकिक आहे आणि या कारण महाराजांचे कर्तृत्व



अलौकिक आहे इतिहासाचे पान कुठल्याही गड किल्ल्याशिवाय हळूच शकत नाही मग तो गड जलदुर्ग असो किंवा जमिनीवरील म्हणजे स्वराज्याच्या बांधणी मध्ये हे किल्ले किती महत्त्वाचे होते हे यावरून दिसून येते आणि आज हा इतिहास असा वारसा जो आहे हा जपण्याचा प्रयत्न जो आहे हे छोटे बालगोपाळ करत तिने साकारलेल्या किल्ला म्हणजे मल्हारगड होय या गडाला सोनेरी किल्ला असे सुध्दा म्हटले जाते पुण्याजवळ हा ऐतिहासिक किल्ला आहे मराठ्यांच्या द्वारे बनवलेला हा अप्रतिम अवैध केला आहे या किल्ल्याची निर्मिती 1775 साली करण्यात आले। या किल्ल्याचे नाव मल्हारी या देवाच्या नावावरून ठेवला हा किल्ला सासवड येथे आहे मल्हारगढ़ किल्ला जवळ जायला सोनेरी किंवा झेंडेवाडी या गावाजवळून जायला लागतात सदर किल्ला बनवुन प्रोत्साहनास पात्र ठरल्या मूळ अक्षा च सर्वच स्तरावर अभिनंदन करण्यात येत आहे जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कुल चे विश्वस्त वामन ठाकूर सर्वच व्यवस्थापकीय सदस्य शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी सारडे विकास मंच चे अध्यक्ष श्री नागेंद्र म्हात्रे हरीश म्हात्रे प्रोफेसर प्रशांत म्हात्रे प्रसाद म्हात्रे व अक्षा चे आई वडील यांनी अभिनंदन केले आहे

# पनवेल महापालिकेत दिवाळीनंतरही दिवाळी सफाई कर्मचारी झाले लिपिक टंकलेखक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर :** दिवाळी नंतरही घरामध्ये दिवाळी साजरी करण्याची संधी पनवेल महापालिकेच्या काही सफाई कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटूंबियांना मिळाली आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी मनापाच्या 12 सफाई कर्मचाऱ्यांना आस्थापना विभागामार्फत लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार विविध विभागातील लिपिक टंकलेखक पदाची रिक्त पदे भरण्यासाठी नियुक्तीला मान्यता देण्यात आली आहे.

राज्य शासनाकडून आलेल्या 09 जून 2025 च्या परिपत्रकानुसार सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने 150 दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम राबविण्याबाबत सूचना प्राप्त आहेत. यानुसार आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेप्रमाणे अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींच्या सुधारणांकरीता पनवेल महानगरपालिका प्रयत्नशील आहे. याचाच भाग म्हणून अनुकंपा/ लाड पागे वारसा नियुक्ती प्राधान्याने पूर्ण करण्यात आली आहे. महापालिका स्थापनेपासून वेगवेगळया संवर्गातील एकूण 12 कर्मचाऱ्यांना पालिकेकडून लाड पागे शिफारसीनुसार नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये अतुल मोहकर, अक्षता रोकडे, रोहन डुलगज, सागर हातळुनकर, अभिजीत जाधव, स्वप्नील कांबळे, मनीष मोरे, नितेश जाधव, अनुष जाधव, राजू मजुंळे, रसिका जाधव, कल्पेश माने यांचा समावेश आहे.

समितीच्या निर्णयानुसार हे सर्व १२ कर्मचारी संबंधित वर्ग-३ पदांच्या कार्यभारावर आज रुजू झाले असून परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या विशेष प्रयत्नातून त्यांना नियुक्ती आदेश महापालिकेकडून जारी करण्यात आले आहे. महापालिकेने ही बदली नियुक्ती प्रक्रिया पारदर्शकपणे आणि शासकीय सेवेनियमांनुसार केल्याचे सांगितले आहे.

# युवा व्हिजनसह राजकीय वाटचाल; स्वप्निल सोनवणे यांनी घेतले सुरेशदादा जैन यांचे आशीर्वाद !

**दैनिक युवक आधार**
**समाधान पाटील जळगाव जिल्हा प्रतिनिधी**

**जळगाव :** स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युवा नेतृत्वाला चालना मिळत असताना, जळगाव तालुक्यातील स्वप्निल सोनवणे यांनी जळगाव जिल्ह्याचे राजकीय पितामह, माजी मंत्री आणि वरिष्ठ नेते सुरेशदादा जैन यांची वाढदिवसानिमित्त भेट घेत त्यांच्या मार्गदर्शनाचा व आशीर्वादाचा लाभ घेतला. या भेटीदरम्यान सुरेशदादा यांनी स्वप्निल यांच्याशी थोडक्यात चर्चा करत पाठीवर आशिर्वादाची थाप ठेवली.

निवडणूक जवळ येत असताना या भेटीमुळे स्वप्निल यांच्या उमेदवारीला युवा आणि वरिष्ठ दोन्ही पातळीवर सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. कानळदा भोकर गटातील गावांच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित काम करण्याची तयारी त्यांनी व्यक्त केली. स्वप्निल सोनवणे हे व्यावसायिक सिव्हिल इंजिनिअर असून त्यांनी आपल्या तांत्रिक ज्ञानाचा वापर करून तालुका तथा जिल्हा स्तरावर



नियोजित पायाभूत सुविधा विकास, गावनिहाय रस्ते बांधणी, स्वच्छता प्रकल्प, पाणीपुरवठा व्यवस्थेचे आधुनिकीकरण तसेच डिजिटल ग्रामसेवा यावर लक्ष केंद्रीत करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. या भेटीवेळी जिल्हा मार्केटिंग फेडरेशन चे संचालक शांताराम सोनवणे, कमलाकर पाटील, आबा कोळी आदिनसह मित्रपरिवार उपस्थित होता.

# श्री.क्षेत्र खाजा बंदे नवाज मंदिर संस्थान नांदेड येथे पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उध्दवराव सरोदे यांचा यथोचित सत्कार

**दैनिक युवक आधार**
**नांदेड/अर्धापूर उध्दव सरोदे**

श्री.क्षेत्र खाजा बंदेनवाज दरबार मंदिर संस्थान व श्री.गुरू विठ्ठलनाथ महाराज देवस्थान संस्थान गोपाळचाव डी नांदेड ता.जि.नांदेड येथे संस्थानचे पुजारी समाधान डाकोरे महाराज गोपाळचावडीकर यांच्या हस्ते खाजा बंदेनवाज दरबार संस्थान येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईच्या अर्धापूर तालुकाध्यक्षपदी पत्रकार उध्दवराव सरोदे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून खाजा बंदेनवाज दरबार



मंदिर संस्थान येथे यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी पुजारी समाधान महाराज डाकोरे,अमरनाथ महाराज,विश्वंभर महाराज आगलावे,शिंदे नरंगलकर, तारू साहेब,ग्रा.पं.गोपाळचावडीचे मा.सरपंच तथा विद्यमान सदस्य आशिर्वाद तुळशीराम डाकोरे,पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष ॲड.गौरव सरोदे, अमोल सरोदे,रवी वाघमारे,कु.सुशांत गौरव सरोदे ,कु.पुर्वी सरोदे,कु. सानवी सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री.क्षेत्र खाजा बंदेनवाज दरबार,गुरू श्री.विठ्ठलनाथ महाराज मंदिर संस्थान गोपाळचावडी नांदेड येथे पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उध्दव सरोदे व त्यांचा परिवार नेहमीच जात असतो व संस्थानच्या सर्व कार्यात सक्रिय सहभागी असतात.याची दखल घेउन देवस्थानचे पुजारी समाधान डाकोरे महाराज यांच्या हस्ते पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उध्दव सरोदे यांचे व पत्रकार संघाचे अभिनंदन करून त्यांचा यथोचित सन्मान करुन सत्कार करण्यात आला.यावेळी व नेहमी पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# नाशिकची ‘द्राक्षांची पंढरी’ आता ‘बिबट्यांची पंढरी’? – वाढत्या हालचालींनी ग्रामस्थ त्रस्त

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर :** द्राक्ष उत्पादनामुळे जागतिक ओळख मिळवलेल्या नाशिक जिल्ह्याला आता नव्या संकटाने ग्रासल्याचे चित्र तयार झाले आहे. ‘द्राक्षांची पंढरी’ म्हणून ओळख असलेल्या या जिल्ह्यात बिबट्यांच्या वाढत्या हालचालींमुळे नागरिक चिंताग्रस्त झाले आहेत. निफाड तालुक्यातील देवगाव, रुई, गोंदेगाव,

आणि मरोळगोई या परिसरात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्यांचा वावर झपाट्याने वाढला असून भीतीचे सावट गडद झाले आहे. रोज सकाळी आणि संध्याकाळनंतर रस्त्यांवर, शेतात, घरांच्या वस्ती जवळ बिबट्या हिंडत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. गुरेढोरे, वासरे व शेळ्यांवर होणारे हल्ले आता दैनंदिन झाले आहेत. अनेकांनी घराजवळ फिरणाऱ्या बिबट्यांचे व्हिडिओ टिपले असून, त्यांचे सोशल मीडियावरही व्हायरल प्रकरणे वाढली आहेत. यामुळे विशेषतः महिलांना व मुलांना बाहेर पडणे धोकादायक ठरत आहे.

वनविभागाने पिंजरे लावणे, टेहळणी



वाढवणे आणि जनजागृती मोहिमा अशा उपाययोजना सुरू केल्या आहेत; मात्र त्यात अपेक्षित वेग नसल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. “बिबट्यांचा वावर आता रोजचा झाला आहे. तरीही कोणतीच ठोस कारवाई दिसत नाही. जीवितास धोका निर्माण झाला आहे,” अशी प्रतिक्रिया अनेक चिंताग्रस्त नागरिकांनी दिली.

परिसरातील ऊस शेती, दाट झाडी, ओढे-नाले व टेकाडे बिबट्यांसाठी अनुकूल अधिवास ठरत आहेत, हे वनविभागही मान्य करतो. परंतु त्यांच्या हालचाली मानवी वस्त्यांच्या अगदी जवळपर्यंत पोहोचल्याने परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तातडीची, समन्वित आणि सर्वांगीण योजना आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, नागरिकांनी संध्याकाळनंतर बाहेर जाणे टाळावे, जनावरांना सुरक्षित बांधावे आणि बिबट्यांची संशयास्पद हालचाल दिसताच वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

शेतीप्रधान नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण जीवनात निर्माण झालेली ही नवी ‘बिबट्यांची पंढरी’ ही ओळख प्रशासनासमोर गंभीर आव्हान बनली असून, आगामी काळात या भीषण संघर्षाचा कायमस्वरूपी तोडगा काढणे अत्यावश्यक ठरणार आहे.

# खारघर रेल्वे स्थानक प्रवेशद्वारावर फेरीवाल्यांचा कब्जा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :** खारघर खारघर रेल्वे स्थानकात बेकायदा फेरीवाल्याचा सुळसुळाट झाला असून, खारघर रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वार असलेल्या मोकळ्या जागेत रेडिमेड कपडे, खेळणी, मोबाईल कव्हर, भेळ आणि फळ विक्रेत्यांनी अनधिकृतपणे व्यवसाय थाटला आहे. खारघर रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वार अनधिकृत फेरीवाल्यांनी बस्तान मांडलेले असतानाही रेल्वे स्थानकांवर कार्यरत असलेले रेल्वे पोलीस, लोहमार्ग पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक आणि सिडको सुरक्षा रक्षक केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने प्रवाशी वर्गातून नाराजी व्यक्त केली जात आहे.

खारघर रेल्वे स्थानकातून दररोज जवळपास सव्वा लाख प्रवाशी प्रवास करतात. त्यामुळे खारघर रेल्वे स्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारावर प्रवाशांची मोठी गर्दी असते. खारघर रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वारावर रेडिमेड कपडे, खेळणी, मोबाईल कव्हर, भेळ आणि फळ विक्रेत्यांनी कब्जा केल्यामुळे रेल्वे प्रवाशांना गर्दीतून वाट काढत खारघर रेल्वे स्थानकात जाताना परतताना मार्ग काढावा लागत आहे. एवढेच नव्हे तर दिव्यांग व्यक्तीला खारघर रेल्वे स्थानकात प्रवेश करता येण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मार्गावर फेरीवाल्यानी कब्जा केल्याचे चित्र दिसत आहे. ८ वर्षांपूर्वी मुंबईतील एल्फिस्टन आणि




**खारघर रेल्वे स्थानकात पोलीस पथक पाठवून खारघर रेल्वे स्थानक आणि प्रवेशद्वारावरील बेकायदा फेरीवाल्यांना हटविले जाईल**
**- विजय तायडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रेल्वे पोलीस ठाणे, पनवेल.**

परेल रेल्वे स्थानक यांना जोडणाऱ्या पुलावर झालेल्या चेंगराचेंगरीत काही प्रवाशांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर रेल्वे स्थानक परिसरात दीडशे मीटर परिक्षेत्रात फेरीवाल्यांना मुंबई उच्च न्यायालयाने मज्जाव केला होता. अलिकडेच दिल्ली मेट्रो स्थानकालगत कार स्फोट झाल्यामुळे पोलीस यंत्रणा जागृत झाली आहे. खारघर रेल्वे स्थानकात अनधिकृत फेरीवाल्यांनी कब्जा केला आहे. सायंकाळी पाच नंतर खारघर रेल्वे स्थानकातून बाहेर पडताना प्रवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

# शाळेची बॅग ठरली ढाल!


## पाचवीतल्या २ मित्रांची बिबट्याशी थरारक झुंज

**दैनिक युवक आधार**

**पालघर :** पालघरच्या आदिवासी बहुल माला पडवीपाडा परिसरात ११ वर्षांच्या मुलांनी दाखवलेले असामान्य धैर्य चर्चेचा विषय ठरले आहे. शाळेतून परतत असताना अचानक समोर आलेल्या बिबट्याशी या मुलांनी दगडफेक, आरडाओरडा आणि हुशारीने वापरलेल्या शाळेच्या बॅगेच्या जोरावर झुंज दिली. त्यांच्या या प्रतिकारामुळे मोठा अनर्थ टळला, मात्र यामध्ये एकाच्या हाताला दुखापत झाली आहे.

**हल्ल्याचा थरार**

पाचवीत शिकणारा मयंक कुवरा आणि त्याचा मित्र शुक्रवारी (दि. २१) सायंकाळी शाळेतून घरी परतत होता. यावेळी अचानक झाडीतून एक बिबट्या बाहेर पडला आणि



मयंकवर झेपावला. अचानक झालेल्या या हल्ल्याने घाबरून न जाता मयंकने शाळेची बॅग पुढे धरून स्वतःचा बचाव केला. बिबट्याच्या नखांचे घाव बॅगेवर आणि त्याच्या हाताला लागले. परंतु, बॅग समोर असल्याने बिबट्याला त्याच्यावर थेट हल्ला करता आला नाही.तत्परतेने बाजूला असलेल्या त्याच्या मित्राने दगड उचलून बिबट्याला मारायला सुरुवात केली आणि आरडाओरडा करून गावकऱ्यांना जमवले. मुलांच्या या प्रतिकारामुळे आणि आवाजाने लोक धावत आले. लोकांच्या भीतीने बिबट्या परत जंगलात पसार झाला.

**इजा झाली पण जीव वाचला**

या प्रसंगात मयंकच्या हाताला बिबट्याची नखे लागल्याने त्याला खोल जखम झाली आहे. त्याला तातडीने विक्रमगड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी सांगितले, की जखमेवर टाके घातले आहेत. आता मुलाची प्रकृती स्थिर आहे.

**वन विभाग सतर्क; धोका कमी करण्यासाठी उपाययोजना**

घटनेची माहिती मिळताच कंचाडचे वन अधिकारी स्वप्नील मोहिते पथकासह तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी हल्ल्याच्या संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेतला आणि ही घटना गांभीर्याने घेत असल्याचे सांगितले. वन विभागाने या परिसरातील शाळांना सावधगिरी म्हणून दुपारी ४ वाजेपर्यंत शाळा बंद करण्याची सूचना केली आहे. तसेच, बिबट्याच्या हालचालींवर सतत लक्ष ठेवण्यासाठी एआय-सक्षम कॅमेरे बसवण्याचे काम सुरू असल्याचे म्हटले. तर, गावकऱ्यांना सतर्क ठेवण्यासाठी परंपरागत दवंडी (ढोल-घंटांच्या सहाय्याने घोषणा) केली जात आहे.

**मुलाच्या धैर्याचे कौतुक**

एवढ्या लहान मुलांनी दाखवलेल्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे. मयंक आणि त्याच्या मित्राने प्रसंगवधान दाखवले नसते तर परिस्थिती भयंकर ठरली असती आणि अनर्थ झाला असता.

## कल्याणच्या सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याची शेअर गुंतवणूकीत दीड कोटीची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**कल्याण :** कल्याण, डोंबिवली शहर परिसरातील पोलीस ठाण्यांमध्ये गेल्या २० वर्षाच्या कालावधीत पोलीस खात्यात असूनही अतिशय सचोटीने पोलीस अधिकारी म्हणून कर्तव्य बजावलेल्या एका ६७ वर्षाच्या सेवानिवृत्त पोलीस अधिकारी आणि त्यांच्या दोन सहकाऱ्यांची शेअर गुंतवणूकीच्या माध्यमातून एक कोटी ४४ लाख रूपयांची दोघांनी फसवणूक केली आहे. या फसवणूक प्रकरणी या पोलीस अधिकाऱ्याने खडकपाडा पोलीस ठाण्यात शुक्रवारी तक्रार दाखल केली आहे.

हा सेवानिवृत्त पोलीस अधिकारी गेल्या वीस वर्षाच्या कालावधीत कल्याण, डोंबिवली पोलीस ठाण्यांमध्ये साहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक या पदांवर कार्यरत होता. आपल्या सेवेच्या कालावधीत या अधिकाऱ्याने पोलीस खात्यात कर्तव्यावर असुनही अतिशय सचोटीने सेवा बजावली.

फसवणूक झालेला पोलीस अधिकारी कल्याण पश्चिमेत बारावे रस्ता परिसरात एका मध्यमवर्गियांची वस्ती असलेल्या गृहसंकुलात कुटुंबियांसह राहतो. या सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याच्या तक्रारीवरून खडकपाडा पोलीसांनी चौकशी करून हा गुन्हा दाखल केला आहे. राजीव अशोक केंद्रे, विठोबा सखाराम मयेकर अशी गुन्हा दाखल गुंतवणूक सल्लागारांची नावे आहेत. केंद्रे हे पुण्यातील वाकड येथील पिंक सिटी रस्ता भागात राहतात. मयेकर हे गोवा राज्यातील म्हापसा रामनगर कोलवले भागात राहतात.मार्च २०२३ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार कल्याण पश्चिमेतील साई चौक भागातील एका रुग्णालयात घडला आहे. सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याने पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की गुंतवणूक सल्लागार राजीव केंद्रे, विठोबा मयेकर यांनी आपणास त्यांच्या एकदंत ट्रेडर्स, ए. आर. वेल्थ व्हेंचर्स एल. एल. पी. या शेअर बाजारात सक्रिय कंपन्यांमध्ये आर्थिक गुंतवणूक केली तर आपणास अल्पावधीत अधिकचा नफा मिळेल. आपल्या गुंतवणुकीवर तीन टक्क्याने दर महिन्याला अधिकचा परतावा दिला जाईल असे अमिष दाखविले.

## भीमशक्ती आणि शिवशक्तीची युती, सत्ता नव्हे तर न्यायासाठी – उपमुख्यमंत्री शिंदे

**दैनिक युवक आधार**

**ठाणे :** ठाण्यात २५ वर्षांपूर्वी आनंद दिघे यांनी भीमशक्ती आणि शिवशक्तीची मुहूर्तमेढ रोवली होती. आता आमची झालेली युती ही सत्ता मिळवण्यासाठी नव्हे, तर सर्वसामान्यांच्या न्यायासाठी आहे. आनंदराज आंबेडकर हे बाबासाहेबांचे रक्त आहेत आणि आम्ही बाबासाहेबांच्या विचारांचे भक्त आहोत, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.ठाण्यातील मासुंदा तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात शुक्रवारी रिपब्लिकन सेनेच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. या वेळी रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर उपस्थित होते. शिवशक्ती आणि भीमशक्ती पुन्हा एकत्र आल्या हा योगायोग नसून इतिहास



घडत आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला जगातले सर्वोत्तम संविधान दिले. त्या घटनेमुळे सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला सुद्धा सर्वोच्च स्थान मिळू शकते.

मी शेतकऱ्याचा मुलगा असूनही राज्याचा मुख्यमंत्री झालो होतो आणि नरेंद्र मोदी हे देखील पंतप्रधान झाले. हे बाबासाहेबांच्या संविधानामुळे शक्य झाले असे शिंदे म्हणाले. आनंदराज यांनी कुठल्याही अटी-शर्तींविना युती केली. माझ्या कार्यकर्त्याला न्याय मिळाला पाहिजे हीच त्यांची एकमेव मागणी होती. ही युती सत्तेसाठी नाही, तर दलित, वंचित, शोषित आणि अन्यायग्रस्त समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आहे असे त्यांनी सांगितले. इंदू मिल स्मारकाचे काम वेगाने सुरू असल्याचेही ते म्हणाले.

## अंबरनाथमध्ये भीषण अपघात; शिवसेना उमेदवाराच्या गाडीने उडवलं, चौघांचा मृत्यू


**दैनिक युवक आधार**

**ठाणे :** सध्या राज्यभरात नगरपंचायत निवडणुकांची धामधूम सुरु आहे. अनेक ठिकाणी प्रचारसभा सुरु आहेत. अशातच, एका प्रचार सभेवरून परतत असताना अंबरनाथ येथे शिंदे गटाच्या उमेदवाराच्या गाडीने अनेकांना उडवलं.

यामध्ये चौघांचा जागीच मृत्यू झाला असून काही जण जखमी झाले आहेत. या घटनेचा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

या भीषण दुर्घटनेत उमेदवाराचा कारचालक लक्ष्मण शिंदे, अंबरनाथ महापालिका कर्मचारी शैलेश जाधव, चंद्रकांत अनारके आणि सुमीत चेलानी या दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला.

अंबरनाथच्या पूर्व-पश्चिम जोडणाऱ्या उड्डाणपुलावर शुक्रवारी (दि.२१) सायंकाळी ही घटना घडली. शिंदे गटाच्या



उमेदवार किरण चौबे यांची ही गाडी होती.

त्यांचा ड्रायव्हर लक्ष्मण शिंदे याला अचानक हृदयविकाराचा झटका आला आणि ही भीषण घटना घडली. त्यांची कार समोरून येणाऱ्या दुचाकींवर आदळली. यामध्ये काहीजण तर थेट उड्डाणपुलावरुन खाली फेकले गेले.

**अपघातावेळी चालकाचा पाय ॲक्सीलेटवर**

शिंदे गटाच्या उमेदवार किरण चौबेही या अपघातात जखमी झाल्या आहेत. किरण यांना स्थानिकांनी कारची काच फोडून बाहेर काढले. चौबे यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, पुलावर गाडी जात असताना चालकाला फोन आला. त्यांनी पाहिले की, तो फोनवर बोलताना अचानक शांत झाला.

पण, त्याच्या पायाने ॲक्सीलेटर जोरात दाबला जात आहे.

काही समजायच्या आतच कार वेगाने पुढे गेली आणि हा अपघात घडला.

या अपघातानंतर स्थानिकांनी तात्काळ मदतीसाठी धाव घेतली.

जखमींना त्वरित रुग्णालयात हलवण्यात आले. चालकाला हृदयविकाराचा झटका आला की अन्य तांत्रिक कारणे होती, याचा तपास सध्या सुरू आहे. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे आमदार बालाजी किणीकर यांनी अपघातग्रस्तांची उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयात जाऊन विचारपूस केली.

## निळजे-दातिवली रेल्वेस्थानकांदरम्यान ५ दिवस मध्यरात्री पॉवर ब्लॉक

**दैनिक युवक आधार**

**ठाणे :** मध्य रेल्वे प्रशासनाने कोकण कॉरिडॉर रेल्वेमार्गावरील रेल्वे वाहतूक सुसह्य करण्यासाठी व डेडिकेट फ्रेट कॉरिडॉर महामंडळाच्या शीळ फाटा येथे असलेल्या रोड ओव्हर पुलाला हटविण्यासाठी आणि कोकण कॉरिडॉर रेल्वे मार्गावरील एक्सप्रेस रेल्वेची वाहतूक सहज आणि सुलभपणे होण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाने कोकण कॉरिडॉर रेल्वे मार्गावरील निळजे ते दातिवली रेल्वे स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन मार्गांवर २५ नोव्हेंबर, ३० नोव्हेंबर, तसेच १ डिसेंबर, २ डिसेंबर आणि ७ डिसेंबर, रोजी मध्यरात्री १ वाजल्यापासून सकाळी ४ वाजेपर्यंत पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकचा परिणाम कोकण कॉरिडॉर रेल्वे मार्गावरील एक्स्प्रेस वाहतूक सेवांवर होणार असल्याचे मध्य रेल्वे प्रशासनाने म्हटले आहे.निळजे ते दातिवली स्थानकावरील ट्रॅफिक पॉवर ब्लॉक दरम्यान मध्यरात्री प्रवास



करणाऱ्या एक्स्प्रेस रेल्वे सेवांना इतर रेल्वे मार्गावर वळवण्यात येईल अथवा इतर रेल्वे स्थानकांवर नियमन करण्यात येईल.

मंगळवार २५ नोव्हेंबर, रोजी रात्री प्रवास करणारी मंगळुरु-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सुपरफास्ट एक्स्प्रेस रेल्वे सेवेला ब्लॉकदरम्यान कळंबोली रेल्वे स्थानकावर ५० मिनिटे थांबवण्यात येईल. तसेच रविवार ३० नोव्हेंबर, रोजी मध्यरात्री कोकण कॉरिडॉर मार्गाने प्रवास करणारी दौंड-ग्वाल्हेर सुपरफास्ट एक्सप्रेस रेल्वेला कर्जत, कल्याण, वसई रेल्वे मार्गावर वळवण्यात येणार आहे. २ डिसेंबर, रोजी मंगळुरु-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सुपरफास्ट एक्स्प्रेस रेल्वेला कळंबोली रेल्वे स्थानकांवर १ तास १५ मिनिटे थांबा देण्यात येईल. रविवार ७ डिसेंबर, रोजी मंगळुरु एक्स्प्रेस सेवेला कळंबोली स्थानकावर ५० मिनिटे थांबवण्यात येईल.रविवारी २३ नोव्हेंबर रोजी ठाणे - कल्याण रेल्वे स्थानकांदरम्यान ५ तासांचा मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. हार्बर, ट्रान्स-हार्बर रेल्वे मार्गावर कोणताही मेगाब्लॉक असणार नाही. मेगा ब्लॉकच्या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून सकाळी ०९:३४ पासून संध्याकाळी ३:१० दरम्यान सुटणाऱ्या डाऊन जलद व अर्ध जलद लोकल रेल्वे सेवा ठाणे आणि कल्याण रेल्वे स्थानकांदरम्यान डाऊन धीम्या मार्गावर वळवण्यात येतील.

कोकण कॉरिडॉर रेल्वे मार्गावरून दिवसभरात प्रवास करणाऱ्या इतर एक्स्प्रेस रेल्वे आणि मेमू लोकल सेवांवर ब्लॉकचा परिणाम होणार नसल्याचे मध्य रेल्वे प्रशासनाने जाहीर केले. त्याचप्रमाणे मध्य रेल्वे प्रशासनाने रेल्वे वाहतूक नियंत्रित करण्यासाठी आणि कोकण कॉरिडॉर रेल्वे मार्गाची देखभाल, दुरुस्तीसाठी पनवेल ते कळंबोली रेल्वे स्थानकांदरम्यान १० दिवस मध्यरात्री ट्रॅफिक पॉवर ब्लॉक घेण्यात आला आहे.

## नगराध्यक्ष पदासाठी १७, नगरसेवक पदासाठी ३१६ उमेदवार रिंगणात

**दैनिक युवक आधार**

**पालघर :** पालघर, डहाणू, जव्हार नगरपरिषद व वाडा नगरपंचायत क्षेत्रातील थेट नगराध्यक्ष पदांसाठी १७ उमेदवार रिंगणात असून या चार शहरांतील ९४ जागांसाठी ३१६ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या आजच्या अखेरच्या दिवशी पर्यंत छाननी दरम्यान आक्षेप नोंदवलेले कोणतेही प्रकरण न्यायप्रविष्ट नसल्याने पालघर जिल्ह्यातील या निवडणुकांमधील निवडणुकीतील चित्र स्पष्ट झाले आहे. डहाणू येथे भाजपा विरुद्ध शिवसेना (शिंदे) अशी थेट लढत होणार असून उर्वरित ठिकाणी प्रामुख्याने तिरंगी



लढती होणे अपेक्षित आहे.

नगराध्यक्ष व नगरसेवक पदांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या १७ नोव्हेंबरच्या मुदतीपर्यंत नगराध्यक्ष पदासाठी ३४ तर नगरसेवक पदांसाठी ४६६ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाली होती. १८ नोव्हेंबर रोजी नामनिर्देशन पत्रांच्या छाननी नंतर चार शहरां मधील नगराध्यक्ष पदासाठी २४ तर नगरसेवक म्हणून ३५४ अर्ज वैद्य ठरले होते. दरम्यानच्या काळात नगराध्यक्ष पदासाठी सात अर्जदारांनी तर नगरसेवक पदासाठी ३८ इच्छुकानी अर्ज माघार घेतल्याने निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे.

डहाणू नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी दाखल झालेल्या चार अर्जांपैकी संजय पाटील (शिवसेना उद्धव ठाकरे) व हाफिज खान (काँग्रेस) पक्षांच्या वतीने दाखल केलेले अर्ज मागे घेतल्याने डहाणूमध्ये माजी नगराध्यक्ष भरत राजपूत (भाजपा) व माजी उपनगराध्यक्ष राजू माच्छी (शिवसेना) यांच्यात सरळ लढत होणार आहे. डहाणू मधील २७ नगरसेवक पदांसाठी वैध ठरलेल्या ७२ अर्जांपैकी सात जणांनी माघार घेतल्याने ६५ उमेदवार रिंगणात आहेत.

## “उपमुख्यमंत्री शिंदेंच्या जिल्ह्यात कांदळवनांची बेसुमार कत्तल करत खाडीपात्र बुजवून भूमाफियांनी...” मनसेने एमएमआरडीएला दिला इशारा

**दैनिक युवक आधार**

**ठाणे :** भिवंडी येथील दिवे अंजुर, माणकोली, दापोडे, गुंदावली आणि पूर्णा या पट्ट्यात कांदळवनांची बेसुमार कत्तल करत खाडीपात्र बुजवून भूमाफियांनी गोदाम थाटले आहे. त्यातून वारंवार आगीच्या दुर्घटना घडत असताना येथे वेअरहाऊस आणि गोदाम कॉम्प्लेक्सकरिता प्रदान केलेल्या जागांच्या नियमितीकरण पत्रातील अटी आणि शर्तींचे उल्लंघन झाल्याचा आरोप मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी यांनी केला आहे.याप्रकरणी जाधव यांनी शिष्टमंडळासह एमएमआरडीए प्रशासनाची भेट घेत निवेदन दिले आहे. नियम पायदळी तुडवणाऱ्या भूमाफियांवर कठोर कारवाई न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला आहे.ठाणे जिल्ह्यात भिवंडी परिसर येत असून या जिल्ह्याचे नेतृत्व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे करतात. याच भिवंडीत पर्यावरणीय नियम धाब्यावर बसवून अनधिकृतरित्या गोदाम थाटणाऱ्या भूमाफियांवर कठोर कारवाई करण्याची मागणी अविनाश जाधव यांनी केली आहे. नियम पायदळी तुडवणाऱ्या भूमाफियांवर कठोर कारवाई न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला आहे.

भिवंडी तालुक्यातील दिवे अंजुर, माणकोली, दापोडे, गुंदावली व पूर्णा या गावांमध्ये मे. इंडियन कॉर्पोरेशन या वेअरहाऊस व गोदाम कॉम्प्लेक्सकरिता एमएमआरडीएने नियमितीकरण पत्र प्रदान केले आहे. अनेक अटी व शर्तींनुसार पत्र प्रदान करण्यात आले आहे. मात्र या नियमितीकरण पत्रातील अटी आणि शर्तींचे उल्लंघन झाल्याने या बांधकामांवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील नमूद



केलेल्या तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करणे आवश्यक असल्याचे पत्र ठाण्याच्या माजिवडा येथील एमएमआरडीए उपप्रादेशिक कार्यालय येथे वरिष्ठ नियोजक मनिषा काळे यांना दिले.

एमएमआरडीए प्रशासनाच्या अटी आणि शर्तींची पूर्तता विकासक मे. इंडियन कॉर्पोरेशनतर्फे रुद्रप्रताप त्रिपाठी यांच्यामार्फत करणे आवश्यक होते. तसेच अटी आणि शर्तींची पूर्तता न केल्यास नियमितीकरण पत्र रद्द समजण्यात येईल. तर गोदामांचे बांधकाम हे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार अनधिकृत ठरविण्यात येऊन त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे नमूद करण्यात आले होते. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या या गोदाम पट्ट्यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी पत्राद्वारे मनसेचे अविनाश जाधव यांनी केली आहे.

**प्रशासनाचे सपशेल दुर्लक्ष**

सीआरझेड क्षेत्रात केलेले अनधिकृत बांधकाम हे पर्यावरण संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्ह्यास पात्र ठरते. असे असताना देखील एमएमआरडीए या अतिशय गंभीर समस्येकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करत आहे. तसेच, सीआरझेड क्षेत्रात आणि इतर सामासिक अंतरातील इमारतींचे भाग निष्कासित न करता अस्तित्वात राहू दिल्यास या इमारतींना दंड आणि वैधानिक शुल्क आकारल्याशिवाय नियमित झाल्या आहेत का, तसेच एमएमआरडीए अधिकाऱ्यांच्या या स्पष्ट दुर्लक्षामुळे शासनाचा महसुल दिवसाढवळ्या बुडवला जात आहे, त्याला जबाबदार कोण, असा प्रश्न जाधव यांनी उपस्थित केला आहे.

**भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करा**

एमएमआरडीएने मेसर्स इंडियन कॉर्पोरेशनला नियमितीकरण पत्रातील अटीनुसार महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालकांकडून प्राप्त झालेल्या ‘सशर्त अग्निसुरक्षा प्रमाणपत्रातील’ अटींचे पालन करण्याचे आणि अग्निशमन विभागाचे “अंतिम ना हरकत प्रमाणपत्र” प्राप्त करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यामुळे भविष्यात अग्नितांडवात जीवितहानी झाली तर त्यासाठी जबाबदार कोण, असा गंभीर प्रश्न जाधव यांनी निवेदनात उपस्थित केला आहे. तसेच एमएमआरडीएच्या संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# मोदी-शहांच्या 'राज्यपाल मॉडेल'ला न्यायिक संरक्षण; अमर्याद हस्तक्षेपाला 'बूस्टर' देणारा सर्वोच्च निर्णय!

**दैनिक युवक आधार** - भारतीय संविधानाच्या संघीय तत्त्वाच्या मूलभूत रचनेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. प्रेसिडेंशियल रेफरन्स (विशेष संदर्भ क्र. १/२०२५) अंतर्गत दिलेल्या मतात कोर्टाने स्पष्ट केले आहे की, राज्यपाल किंवा राष्ट्रपतीला विधेयकांच्या मंजुरीसाठी कोणतीही कालमर्यादा लादता येत नाही आणि 'डीम्ड असेंट' (स्वयंचलित मंजुरी) ही संकल्पना संविधानात अस्तित्वात नाही. सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठाने (सूर्यकांत, विक्रम नाथ, पी.एस.नरसिम्हा आणि ए.एस. चांदुरकर) हा निर्णय दिला असला तरी, तो विधिशास्त्रीय व्याख्येच्या चौकटीत राहूनही राजकीय दुरुपयोगाला वाव देणारा आणि राज्य सरकारांच्या संसदीय स्वायत्ततेच्या विरोधात जाणारा आहे. हा निर्णय संविधानाच्या कलम २०० आणि २०१ च्या मूलभूत साराला धक्का देणारा असून, केंद्र-राज्य संबंधांमधील विद्यमान तणावाला आणखी बळकटी देणारा आहे. या निर्णयामुळे केंद्र सरकारला राज्यपालांद्वारे विरोधी राज्यांवर अप्रत्यक्ष नियंत्रण साधण्याची शक्ती मिळाली असून, ती संघीय लोकशाहीच्या मूलतत्त्वांना हानी पोहोचवणारी आहे.



**संवैधानिक व्याख्येच्या सीमांमुळे उद्धवलेली समस्या**

सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात नमूद केले आहे की, संविधानात राज्यपाल किंवा राष्ट्रपतीला विधेयकांवर कारवाईसाठी कोणतीही विशिष्ट कालमर्यादा नमूद केलेली नाही. यामुळे न्यायालयांना अशी मर्यादा लादता येत नाही. हे विधान शब्दशः संविधानाच्या व्याख्येनुसार बरोबर असले तरी, ते संविधानाच्या उद्देश्याकडे दुर्लक्ष करणारे आहे. संविधानाची व्याख्या केवळ अक्षरशः नसून, तिच्या मूलतत्त्वांच्या भावनेनुसार असावी, असे संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अधोरेखित केले होते.

तामिळनाडू सरकार आणि राज्यपाल आर.एन. रवि यांच्यातील वाद २०२३ पासून सुरू झाले, जेव्हा राज्यपालांनी डीएमके सरकारच्या १० विधेयकांना मंजुरी नाकारली किंवा राष्ट्रपतींकडे पाठवली. या विधेयकांमध्ये शिक्षण, आरोग्य आणि प्रशासकीय सुधारणांसंबंधीचे महत्त्वाचे कायदे सामील होते. एप्रिल ८, २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकारच्या याचिकेवर सुनावणी घेतली आणि राज्यपालांच्या कारवाईला "अवैध आणि मनमानी" ठरवले. न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने कलम १४२ च्या विशेष अधिकारांचा वापर करून या १० विधेयकांना 'डीम्ड असेंट' दिला आणि राज्यपालांनी भविष्यातील विधेयकांसाठी तीन महिन्यांची कालमर्यादा आखून दिली. यात राज्यपालांना विधेयक मंजूर करणे, नाकारणे किंवा राष्ट्रपतींकडे पाठवणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते. राष्ट्रपतींनाही रिझर्व केलेल्या विधेयकांसाठी तीन महिन्यांची मर्यादा लादली होती. हा आदेश तामिळनाडू सरकार आणि सगळ्याच राज्यांसाठी मोठा दिलासा ठरला होता, मात्र या निर्णयाने त्या आदेशाला पूर्णपणे धक्का बसला आहे.

प्रश्न असा निर्माण होतो की, वेळमर्यादा नसल्यास राज्यपाल विधेयके वर्षानुवर्षे थांबवू शकतात का? संविधानाच्या कलम २०० नुसार राज्यपालांना मंजुरी देणे, परत पाठवणे किंवा राष्ट्रपतींकडे पाठवण्याचा अधिकार आहे, पण त्यात समयबद्ध कारवाईची नैसर्गिक अपेक्षा आहे. भारतीय संविधानात राज्यपालाची भूमिका प्रतीकात्मक आहे, राजकीय हस्तक्षेपाची नाही. तरीही, हा निर्णय राज्यपालांना व्हेटो पॉवरसारखे असीमित अधिकार देतो. 'डीम्ड असेंट' नाकारण्याने विधेयकांची विधायी प्रक्रिया नैसर्गिक प्रवाहातून बाधित होते, ज्यामुळे राज्य सरकारांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो आणि केंद्राच्या हस्तक्षेपाला प्रोत्साहन मिळते.

**मोदी-शहा यांचे 'राज्यपाल मॉडेल': संघराज्यावर नियोजनबद्ध प्रहार**

२०१४ नंतर केंद्र सरकारची राज्यांना नियंत्रित करण्याची रणनीती अधिक संघटित व अधिक व्यूहात्मक बनली आहे. मोद-शहा नेतृत्वाने विरोधी राज्यांवर राजकीय अंकुश ठेवण्यासाठी राज्यपाल संस्थेचा वापर अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केला आहे.राज्यपालांच्या नियुक्त्या, त्यांचे वक्तव्य, विद्यापीठ धोरणांमध्ये हस्तक्षेप, विधेयकांना अडथळा हे सर्व एक 'राजकीय ब्लू-प्रिंट'चा भाग असल्याचे दिसते. अनेक राज्यांत राज्यपालांनी साधी संवैधानिक तटस्थता सोडून राज्य सरकारांना सतत अडचणीत आणणारी भूमिका घेतली आहे.

केरळ, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, कर्नाटक आणि तेलंगणसारख्या विरोधी पक्ष सत्तेत असलेल्या राज्यांमध्ये केंद्रीय आदेशानंतर राज्यपालांकडून विधेयकांना अडवण्याची स्पर्धाच सुरु होती, आता त्याला न्यायिक संरक्षण मिळाले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही, अनेक राज्यांमध्ये ३० हून अधिक विधेयके राज्यपाल किंवा राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी प्रलंबित आहेत. यात पश्चिम बंगाल, कर्नाटक, तेलंगण आणि केरळ सारखे विरोधी पक्षांचे राज्य प्रामुख्याने सामील आहेत. हे विधेयके प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य आणि प्रशासकीय सुधारणांशी निगडित असून, राज्य सरकारांच्या धोरणांना अडथळा आणत आहेत.केरळमध्ये राज्यपाल आरिफ मुहम्मद खान यांनी विश्वविद्यालये सुधारणा विधेयके वर्षभरापासून लटकवले, यामुळे राज्य सरकार आणि राज्यपाल यांच्यातील तणाव वाढला होता. तमिळनाडूमध्ये राज्यपाल आर.एन. रवि यांनी १० हून अधिक विधेयकांना राष्ट्रपतींकडे पाठवले. पश्चिम बंगालमध्ये राज्यपाल जगदीप धनखड यांनी ममता बॅनर्जी सरकारच्या १९ विधेयकांना अडवले, ज्यात कायद्याच्या सुधारणांसह सामाजिक कल्याणकारी योजना सामील होत्या. कर्नाटकमध्ये राज्यपाल थावर चंद गहलोत यांनी सिद्धरामय्या सरकारच्या १० विधेयकांना प्रलंबित ठेवले, ज्यामुळे राज्याच्या विकास योजनांना उशीर झाला. तेलंगणमध्येही राज्यपालांनी ३ विधेयके लटकवली असून, हे सर्व उदाहरणे केंद्राच्या राजकीय धोरणांचे प्रतिबिंब आहेत. महाराष्ट्रातही बेकायदेशीर सत्तापालटात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा मोठा वाटा राहिला आहे. त्याबाबत सर्वोच्च न्यायालयानेही ताशेरे ओढलेले आहे. राज्यपाल आता केंद्राचे हस्तक बनलेले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय संघराज्यीय पद्धत मोडीत काढण्यास हातभार लावणारा आहे. हा निर्णय राज्य सरकारांना केवळ अडचणीत टाकणाराच नाही, तर लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर हल्ला करणारा आहे. विधानसभांमध्ये जनतेचे प्रतिनिधित्व असते, आणि त्या मंजूर केलेली विधेयके राज्यपालांच्या इच्छाधीन ठेवणे म्हणजे अप्रत्यक्षपणे केंद्राच्या हस्तक्षेपाला मोकळीक देण्यासारखे आहे. १९७० च्या दशकातील आणीबाणीप्रमाणे, आज केंद्र सरकार विरोधी राज्यांना राज्यपालांद्वारे नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत आहे. सर्वोच्च न्यायालयाने याला आळा घालण्याऐवजी कायदेशीर पाठबळ दिले आहे, जे संविधानाच्या प्रस्तावनेतील 'संघराज्यीय' तत्त्वाच्या विरुद्ध आहे.

**न्यायिक भूमिकेचे संकुचित स्वरूप: व्याख्यावादाचे जाळे**

सर्वोच्च न्यायालयाने असेही नमूद केले आहे की, न्यायालयांना राज्यपाल किंवा राष्ट्रपतींवर वेळमर्यादा लादता येत नाहीत, कारण ते 'राजकीय प्रश्न' आहेत. हे 'राजकीय प्रश्न सिद्धांत' (Political Question Doctrine) चे अनुकरण आहे, जे अमेरिकन न्यायव्यवस्थेतही विवादास्पद आहे. न्यायमूर्ती गवई यांनी १४ प्रश्नांना उत्तर देताना म्हटले की, राज्यपाल विधेयके 'अनिश्चितकाळ' थांबवू शकत नाहीत, पण त्यासाठी कोणतीही अंमलबजावणीची तरतूद नाही. यामुळे विधानसभांना न्यायिक उपाययोजना उपलब्ध होत नाहीत.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय संविधानाच्या संघीय आत्म्याला धक्का देणारा असून, राजकीय हस्तक्षेपाला प्रोत्साहन देणारा आहे. राज्यपालांना वेळमर्यादा लादणे आणि 'डीम्ड असेंट' ची तरतूद करणे आवश्यक आहे, जसे इंग्लंडमधील 'रॉयल असेंट' प्रक्रियेत आहे. मात्र सर्वोच्च न्यायालय संवैधानिक विधायी प्रक्रिया सुधारणेच्या बाबतीत संकुचित झाला आहे असेच आता म्हणावे लागेल.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्य सरकारांची संसदीय शक्ती आता केंद्राच्या दया-क्षमेच्या भिकेवर अवलंबून रहाणारी होईल. हा निर्णय केवळ विधिशास्त्रीय मुद्दा नाही, तर लोकशाहीच्या भविष्याशी निगडित आहे.

"न्यायव्यवस्थेने स्वतःची भूमिका पुनर्स्थापित करून संविधानातील 'संघराज्य व्यवस्था' या मूलभूत संरचनेला तडा जाऊ नये, याची काळजी घेणे आता अपरिहार्य आहे."

**अ‍ॅड. राहुल एस. वारे**

## ग्रामविकासातील योगदानाची राज्यस्तरावर दखल; मंगरुळे यांचा गौरव-जरंडीच्या अभिमान

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**



**सोयगाव:-** तालुका तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतीचे कर्तव्यदक्ष ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांची राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कारासाठी निवड झाली असून गुरुवारी हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला.सुनिल मंगरुळे यांनी जल व्यवस्थापन,स्वच्छ भारत अभियान,हरित गाव उपक्रम, डिजिटल ग्रामपंचायत, महिला-बालकल्याण तसेच गावातील मूलभूत सुविधांच्या उभारणीत केलेल्या योगदानाची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. समाजाभिमुख व लोकसहभागातून गावाचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी सातत्याने केलेले परिश्रम ही त्यांच्या निवडीमागची प्रमुख कारणे असल्याचे समजते.या यशाबद्दल जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके, गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड,विस्तार अधिकारी अशोक दौड,जरंडीच्या सरपंच स्वाती पाटील, फर्दापुर च्या सरपंच फतीमाबी पठाण, ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष सुनिल राकडे नाना,समाधान तायडे,संजीवन सोनवणे,रवींद्र पाटील,वंदना पाटील आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामसेवक सुनील मंगरुळे यांचा हा सन्मान सोयगाव तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरत असून भविष्यात अधिक समृद्ध व आदर्श गाव निर्माण करण्याचा नवा संकल्प यावेळी पत्रकार बाळु शिंदे व विजय चौधरी,यांनी व्यक्त केली.

## पक्षी सप्ताह २०२५ निमित्त जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूलमध्ये फ्रेंड्स ऑफ नेचर फॉन सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चिरनेर,उरण-रायगड (महाराष्ट्र) तर्फे व्याख्यान

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर,खोपटे ( गिरीश भगत)** : पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे कारण या भूतलावर अनेकप्रकारची जैवविविधता आहे.भारतात सुमारे १४०० अशा पक्षांच्या प्रजाती आहेत या प्रजाती मात्र आजच्या काळात पर्यावरणास गौण मानून मानवाच्या अति हव्यासापोटी निसर्गाची अपरिमित हानी होत आहे.त्यात अनेक प्रजाती नष्ट होत चाललेल्या आहेत. दिनांक ५ जानेवारी ते १२ जानेवारी पर्यंत पक्षी सप्ताह साजरा केला जातो.महत्त्वाचा घटक म्हणजे पक्षी या पक्षांच्या विविध प्रजाती व पक्षी प्रजाती व त्यांचे अस्तित्व हा अतिशय ज्वलंत विषय आहे त्या संबंधी त्यांची माहिती तसेच अशा प्रकारच्या पक्षांचे संवर्धन ही काळाची गरज आहे यासाठी फ्रेंड्स ऑफ नेचर(फॉन) उरणचे सदस्य व वन्यजीव अभ्यासक श्री.निकेतन रमेश ठाकूर यांचे आत्माराम ठाकूर मिशन संचलित जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आवरे मधील आठवी नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान चे आयोजन करण्यात आले जानकीबाई जनार्दन ठाकूर चे सर्वेसर्वा स्वर्गीय अशोक ठाकूर सर यांचे स्वप्न होते की,आपला विद्यार्थी अभ्यासासमवेत सर्वच क्षेत्रात अग्रेसर असावा, यासाठी म्हणजे त्याला या इंटरनेट च्या जगातील सर्वच माहिती मिळावी व अशोक ठाकूर सर हे स्वतः निसर्गमित्र होते. त्यांच्या साठी अशोक ठाकूर सर यांनी आवरे येथील दक्षिणेकडे



मोठे खार खोद काम करुन पक्षी व प्राणी यांना वर्षभर पिण्यास मुबलक पाणी मिळेल या उद्देशाने हे मौलिक कार्य केले. सदर व्याख्यानाचा लाभ हा जानकीबाई जनार्दन ठाकूर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतला अतिशय अभ्यासपूर्ण व मजेशीर अशा पद्धतीने आपल्या सभोवताली असणारे पक्षी विश्व त्यांनी विद्यार्थ्यांसमोर उलगडले.तसेच विविध पक्षांचे चित्रफीत दाखवून,त्याबद्दलचे अद्यावत माहिती ही निकेतन ठाकूर यांनीविद्यार्थ्यांना दिली तसेच सेमिनारच्या शेवटी एक माहितीपट (डॉक्युमेंटरी) दाखवून, सदर कार्यक्रमचा समारोप करण्यात आला. सदर कार्यक्रम प्रसंगी जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ.निकिता म्हात्रे तसेच विद्यालयातील शिक्षक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांची सन्माननीय उपस्थिती लाभली.तसेच हा कार्यक्रम विद्यालयात राबविल्या बद्दल संस्थेचे सचिव विश्वस्त श्री वामन ठाकूर , अलका ठाकूर , प्रसाद ठाकूर सिंधू ठाकूर व आदिनाथ ठाकूर,रिना ठाकूर यांनी विशेष कौतुक केले आहे.

## काँग्रेसच्या विकासकांमाची यादी करायची तर कागद संपतो; भाजपाने मात्र खोटारडेपणा व चॉकलेटच दिले - हर्षवर्धन सपकाळ

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** काँग्रेस पक्षाने ७५ वर्षात काय दिले असा प्रश्न काही लोक विचारत असतात. काँग्रेस पक्षाने रोजगार दिला, शिक्षण, आरोग्य, रस्ते, वीज, औद्योगीकरण, तंत्रज्ञानासह चौफेर विकास केला. काँग्रेसने ७५ वर्षात केलेल्या कामांचा हिशोब लिहिण्यास बसलो तर कागद संपतो पण भाजपाने काय दिले याचा हिशोब केला तर फक्त खोटारडेपणा व चॉकलेटच दिले, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज वसमत, भोकर नगरपालिका निवडणुकीसाठी प्रचार सभा घेतल्या. यावेळी खासदार प्रा. रवींद्र चव्हाण, तालुकाध्यक्ष गोविंद बाबागौड पाटील, नांदेड शहराध्यक्ष अब्दुल सत्तार अब्दुल गफूर, सुरेंद्र घोडसकर, तिरुपती पाटील कोंढेकर, सुरेश दादा गायकवाड, युवक काँग्रेस जिल्हा अध्यक्ष बालाजी गाडे, भारतीताई पवार, रेखाताई चव्हान, तौसिफ इनामदार, आदिनाथ चिंताकुटे आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, देशाच्या विकासात काँग्रेसचे मोठे योगदान आहे ते कोणीही नाकारू शकत नाही. पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यापासून डॉ. मनमोहनसिंह यांच्यापर्यंत विकासाची शिखरे काँग्रेस सरकारने गाठली. पण २०१४ पासून सत्तेत आलेल्या भाजपाने काय दिले, तर फक्त खोटी आश्वासने दिली. नोटबंदी केली पण काळा पैसा बाहेर आला नाही, अतिरेकी कारवाया थांबल्या नाहीत फक्त सर्वसामान्य जनतेला त्रास झाला. दरवर्षी २ कोटी नोकऱ्या, प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये, शेतकऱ्यांचे उत्तपन्न दुप्पट करणार हे सर्व हवेतच विरून गेले. नरेंद्र मोदींच्या राजवटीत अदानी व अंबानी तुपाशी आणि जनता मात्र उपाशी अशी परिस्थिती आहे..काँग्रेस पक्षाने भोकरला खूप काही दिले. आमदार, खासदार, केंद्रीय मंत्री, दोनदा मुख्यमंत्रीपद दिले पण भोकरला आल्यावर मात्र... नाम बडे और दर्शन खोटे, अशी परिस्थिती होती, अशा लोकांचा इतिहास विसरू नका. *भोकरचे ते डरपोक लोक मोदींच्या कळपात जाऊन बसले, 'जो डर गया ओ मर गया', त्यांनी गद्दारी केली, पळून गेले आता शेठ, सावकारांचे राज्य नको, जनतेचे राज्य हवे असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार हे जाणते नेतृत्व आहेत, त्यांनी राज्याच्या विकासासाठी, समाजकारणासाठी आपली हयात खर्ची घातली, वैचारिक मतभेद असू शकतात पण आज सत्ताधारी पक्ष त्यांना त्रास देत आहे, ते अशोभनीय आहे. शरद पवार यांचा पक्ष फोडला, बाळासाहेब ठाकरे यांचा पक्ष फोडला. पूर्वी पोरं चोरणारी टोळी होती आता भाजपा हा पक्ष फोडणारी टोळी बनली आहे, याचा धिक्कार करतो असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## क्षुल्लक वादातून १२ वर्षीय मुलीची आत्महत्या

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :** शाळेतील गॅदरिंगचा कार्यक्रम पाहण्यासाठी लहान भावाने टीव्हीचा रिमोट न दिल्यामुळे झालेल्या वादातून १२ वर्षीय मुलीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची मन हेलावणारी घटना पनवेल येथील आसुडगांव परिसरात घडली आहे. माही उर्फ अंजली ओमप्रकाश गुप्ता (वय १२) असे या मृत मुलीचे नाव आहे. आसुडगांव, सेक्टर-५ मध्ये राहणारी माही गुप्ता तिच्या आई-वडील आणि लहान भावासह राहत होती. माही हिला टीव्हीवर तिच्या शाळेचा मुलीची आत्महत्या गँदरिंगचा कार्यक्रम पाहायचा होता. त्यासाठी तिने लहान भावाकडे टीव्हीचा रिमोट मागितला. मात्र, लहान भावाला दुसरा कार्यक्रम पाहायचा असल्याने त्याने तिला रिमोट देण्यास स्पष्ट नकार दिला. या क्षुल्लक कारणावरुन बहिण-भावांमध्ये जोरदार वाद झाला. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या माहीने रागाच्या भरात टोकाचे पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला. ती तत्काळ घरातील दुसऱ्या मजल्यावर गेली आणि तेथील छताच्या पाईपला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.काही वेळानंतर माहीची आई तिला पाहण्यासाठी वरच्या मजल्यावर गेली असता, तिला माही गळफास घेतलेल्या स्थितीत आढळली. या हृदयद्रावक प्रकारानंतर माहीच्या आईने शेजाऱ्यांच्या मदतीने तिला तत्काळ पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी माहीला दाखलपूर्व मृत घोषित केले. खांदेश्वर पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत. दरम्यान, अवघ्या १२ वर्षांच्या मुलीने रागाच्या भरात इतके मोठे पाऊल उचलल्याने आसुडगांव परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

## दौलवडगाव महसूल मंडळातील शेतकऱ्यांना अद्याप अतिवृष्टीचे अनुदान नाही, प्रशासनाकडे तातडी वितरणाची मागणी

**दैनिक युवक आधार**
**आष्टी (जि. बीड) प्रतिनिधी :** आष्टी तालुक्यातील दौलवडगाव महसूल मंडळाअंतर्गत येणाऱ्या अनेक गावांतील शेतकऱ्यांना ऑक्टोबर 2025 मध्ये झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान सहन करावे लागले आहे. मात्र या नुकसानग्रस्त काही शेतकऱ्यांना अद्याप कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळाले नसल्याचे समोर आले आहे. यासंदर्भात दौलवडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते अ‍ॅड. संभाजी मोहन दहातांडे यांनी तहसीलदार, आष्टी यांच्याकडे निवेदन सादर केले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची तातडीने चौकशी करून अनुदान वितरण करण्याची मागणी केली आहे.दौलवडगाव, पिंपळगाव घाट, बांदखेल, कारखेल, सालेवडगाव, अंभोरा, नांदूर वाघळूज, अरणविहिरा, देऊळगाव घाट, सावरगाव घाट, शेडाळा आदी गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी




वाहून गेल्या असून पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तरीही शासनाने जाहीर केल्याप्रमाणे मदत न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.निवेदनात नमूद केलेल्या यादीतील शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान देण्यात यावे तसेच संबंधित तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना देण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्याची तयारी असल्याचेही संकेत काही शेतकऱ्यांनी दिले आहेत.

## शूरवीर गोविंद गोपाळ (महार) गायकवाड यांचे स्मारक बांधण्यासाठी बहुजननायक वामन मेश्राम यांनी दिला ५ लाखाचा निधी

**दैनिक युवक आधार**
**बोरघर / माणगाव :** छत्रपती संभाजी महाराज यांचे अंतिम संस्कार करणारे धाडशी शूरवीर योद्धा गोविंद गोपाळ ( महार ) गायकवाड यांचे स्मारक बनविण्यासाठी जनांदोलनाचे प्रवर्तक, बामसेफ या राष्ट्रव्यापी देशव्यापी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष, बहुजन नायक वामन मेश्राम यांनी आपल्या वाढदिवसा निमित्त ५ लाख रुपये वढू बुद्रुक येथे आपल्या कार्यकर्त्यां समवेत जाऊन दिले.


मूलनिवासी नायक मा.वामन मेश्राम साहेब...
राष्ट्रीय अध्यक्ष बामसेफ,भारत मुक्ती मोर्चा

यामुळे बहुजन महापुरुषांचा क्रांतिकारी वारसा जपण्याचे काम केवळ बहुजनांचे एकमेव राष्ट्रीय नेते,लोकप्रिय, बहुचर्चित राष्ट्रीय नेतृत्व वामन मेश्राम साहेब करत असल्याचे देशभर सर्व समाज घटकात चर्चा सुरू आहे.

बामसेफ चे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम हे गेल्या ५० वर्षांपासून देश विदेशात बहुजन समाजाला जागृत करण्याचे काम करत आहेत. आता पर्यंत त्यांनी साडे सहा हजार जातींपैकी ४५०० मूलनिवासी बहुजन समाजातील जातींना एकत्र करून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायावर आधारित नवा समाज, नवे बहुजन राष्ट्र निर्माण करण्याचे अर्थात व्यवस्था परिवर्तनाचे महान कार्य वायू गतीने, अहोरात्र करत असल्याचे आज दिसून येत आहे. या महान कार्याला पूर्ण करण्यासाठी महान त्यागी नेतृत्व वामन मेश्राम यांनी देशभरात मूलनिवासी बहुजन समाजाचे नेतृत्व करण्यासाठी लाखो कार्यकर्ते, प्रतिनिधी तयार केले आहेत. तसेच EVM ईव्हीएम मशीन च्या विरोधात आवाज उठविणारे जगातील पहिले बहुचर्चित व्यक्तिमत्व वामन मेश्राम ठरले आहेत, अशी त्यांची ओळख आहे. वामन मेश्राम यांनी विदेशी शत्रू निर्धारित केल्यामुळे येणाऱ्या काळात संपूर्ण बहुजन समाज त्यांच्या नेतृत्वात एकवटणार आहे.

## मुतम्माबाई माडपेल्लीवार यांचे निधन

**दैनिक युवक आधार**
**किनवट माहूर**
**प्रतिनिधी:सय्यद ईसा**



किनवट शहरातील स्वर्गीय मुतम्माबाई नरसिंमलू माडपेल्लीवार राहणार साठे नगर किनवट यांचे दि 23 रोजी वयाच्या 90 व्या वर्षी राहत्या घरी निधन झाले दि 23 रोजी सायंकाळी चार वाजता त्यांचे वर साठे नगर येथील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली त्यांचे पश्चात दोन मुलं दोन मुली नातू पणतू असा परिवार असून माहूर शहरातील प्रसिद्ध व्यापारी नारायणराव माडपेल्लीवार यांच्या त्या आई होत्या तर पत्रकार अनिल माडपेल्लीवार यांच्या त्या आजी होत्या